
MAHMAR/19358/13/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे

# व्ही. पी. एम्. दिशा



वर्ष बारावे / अंक ११ / नोव्हेंबर २०११

## संपादकीय

## दरी रुंदावत आहे

प्रत्येक क्षेत्रामधील नेतृत्त्वाच्या सर्व बाजूंचा विचार करता ठळकपणाने जाणवणारी एक गोष्ट म्हणजे, या नेतृत्त्वाचे झपाट्याने स्खलन होत चालले आहे. या निरीक्षणाला असणारा अपवाद हा हे निरीक्षण सिद्ध करणारा, हाताच्या बोटांवर मोजता येईल इतपतच आहे. या स्खलनाचा, अवमूल्यनाचा परिणाम तितक्याच गतीने समाजातील शांतता, मानवी जीवनातील नाते संबंध, सामाजिक जाणीवा यांच्यावर होत आहे. १९७० नंतरच्या काळात दिशा हीनतेकडे चाललेल्या या प्रवासाचा वेग अफाट वाढला आहे.

गेल्या शतकात झालेल्या दोन महायुद्धांनी आणि युद्धांतून होणाऱ्या सर्व प्रकारच्या परिणामांनी ही दिशाहीनता अधिकच वाढत चाललेली आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या आगे मागे जगातील अनेक राष्ट्रांना राजकीय स्वातंत्र्य मिळाले. त्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या संकल्पना, सीमारेषा बदलल्या. राजकारण हा पूर्णवेळ 'व्यवसाय' करून सत्तेसाठी झटायचे अथवा विरोधी पक्ष म्हणून प्रगतीच्या गतीत वा अधोगतीत आपला खारीचा वाटा उचलायचा याची जणू काही स्पर्धाच चालू आहे. यामुळे सार्वजनिक जीवनातील सर्वच क्षेत्रांतील प्रत्येक कृती ही राजकारणाने प्रेरित झाली आहे. शिवाय ती भ्रष्टाचाराचे मूळ ठरू लागली आहे.

यामधून राजकीय क्षेत्रातील नेतृत्व हे सर्वव्यापी बनत गेले आणि राजकारण म्हणजे स्वार्थीपणा, स्वतःच्या सात पिढ्यांचा उद्धार करणे अशी भावना वेगाने वाढत गेली यामुळे कोणतीही निवडणूक लढवणारा व ज्याचे उत्पन्न शेकड्यात हजाऱ्यांच्या घरात जाई तेच उत्पन्न कोटींच्या घरात, अब्जावधींच्या घरात जायला लागले याचा स्वाभाविक परिणाम स्वातंत्र्यपूर्व काळातील राजकीय नेतृत्त्वात असणारी शुचिता, चारित्र्य यांची जागा भ्रष्टाचार व कुटील डावपेच यांनी घेतली. याच्या परिणामी शासनकर्ते (नोकरशहा नव्हे तर राज्यकर्ते) निवडणूक प्रक्रियेतून निवडून येणारे व लोकांचे प्रतिनिधीत्व करण्याचा दावा करणारे राजकीय लोक आणि सामान्य जनता यांच्यात प्रचंड मोठी दरी निर्माण झाली ज्यांचे प्रतिनिधीत्व करायचे त्यांच्या प्रश्नांचा अभ्यास असणे, त्यांची उकल करण्याचा विचार केलेला असणे, आपल्या संबंधित मतदार संघातील मतदारांना भेटणे हे सर्व मागे पडून भलत्याच व भ्रष्टाचार मूलक पद्धतीचे पायंडे पडायला लागले.

(मलपृष्ठ २ वर)

(मुखपृष्ठावरून )

**संपादकीय**

जे राजकारणाच्या क्षेत्रात चालू आहे तेच आणि तसेच सांस्कृतिक सामाजिक आर्थिक, साहित्यिक इ. क्षेत्रांमध्ये चालू झाले असून त्यातून 'आतले व बाहेरचे' असे दोन वर्ग निर्माण झाले. सकारात्मक विधायक, राजकारणाचे तीन तेरा वाजले आणि प्रत्येकच 'आतला' हा बाहेरच्या सर्वसामान्य जीवनातील व्यक्तीला 'बनचुका' वाटायला लागला. जनतेला तसे अनुभव मोठ्या प्रमाणात यायला लागले. भ्रष्टाचाराला विरोध करण्यासाठी ही भ्रष्टाचाऱ्यांचाच वापर व्हायला लागला आणि एका शून्य गोंधळलेल्या दिशेने लोकशाहीची वाट वळायला लागली.

हे जगभरच चालू झाले यात विलक्षण गती आली याचे कारण विज्ञान आणि इलेक्ट्रानिकसच्या क्षेत्रातील प्रगतीमुळे जीवनाच्या दिशा अंधकारमय झाल्या आहेत. ही २०११ हे वर्ष संपत आलेले असतानाची स्थिती आहे. चांगले वाईट सत् असत खरे खोटे यांच्यामधील सीमारेषा अस्पष्ट आणि सापेक्ष व्हायला लागल्या आहेत.

इलेक्ट्रॉनिकस् माध्यमे व एकूणच जीवनशैली यांनाच फक्त दोष देणे योग्य ठरणार नाही. याचा वापर माणूस कसा करतो यावर आहे. हे न समजण्या इतके आपण खुळे राहिलेलो नाही. घटना, मूलभूत हक्क, कायदे, कायद्यांची अमंलबजावणी इत्यादी कोणत्याही बाबीत गोंधळाचे चित्र आहे.

यातून सर्व सामान्य जनतेच्या मनात (सर्व सामान्य या शब्दाचा अर्थ ज्यांचे पोट हातावर आहे, दोन वेळेला खायला मिळण्याची भ्रांत आहे असा नागरिक होय!) महागाईला कारणीभूत ठरलेली राजकीय मंडळी स्वत: विमानाने परदेश वाऱ्या करतात पण त्यांना रस्त्यातले खड्डे दिसत नाहीत असा राजकीय वर्ग आता जनता शत्रू मानू लागली आहे. जनतेला या देशातील सार्वजनिक जीवनाबद्दल शाश्वती वाटेनाशी झाली आहे. किंबहुना भ्रष्टाचार विरोधी म्हणून तथाकथित सृष्टांसह सर्वाबद्‌लच जनतेच्या मनात संशयाची भावना आहे. गेली पाच दहा वर्षे ही भावना वाढत चालली आहे. परदेशांतील सत्तेचे गुलाम असोत की आपल्या देशातील सत्तेचे गुलाम असोत हे आपले काही भले करणार नाहीत अशी जनतेची खात्री बनत चालली आहे.

त्यातूनच मतदानावर बहिष्कार, काळ्या फिती लावून निषेध इथपासून ते राजकीय सत्ताधाऱ्यांना चप्पल बूट फेकून मारण्यापर्यंत घटना घडतात. कोणतीही भावना जास्त काळ दाबून ठेवली की ती उफाळून वर येते. त्याचप्रमाणे जनतेच्या मनातील हा असंतोष उफाळून बाहेर पडताना दिसतो. हे वैध की अवैध, योग्य की अयोग्य यावर हवी तेवढी चर्चा करता येईल पण कालपर्यंत आपल्या सारख्या असणाऱ्या माणसाची राजकीय लालसा पूर्ण होताच त्याची मिळकत काही कोटी रुपयांच्या घरात जाते. त्याच्या नावावर काही बंगले काही जमिनी जमा होतात (अधिकृतपणे जाहीर होणारे आकडे लक्षात घेता), तेव्हा घाम गाळणाऱ्या माणसांच्या मनात संशयाची वलये निर्माण होणारच.

सार्वजनिक जीवनात पाळावयाची किमान शुचिर्भूतता, बांधीलकी, एकूणच जागतिक इतिहासाचे किमान ज्ञान नितीमूल्यांची समज हे सर्व एका रात्रीत वाढेल असे नाही, पण जनता व जनतेच्या दृष्टीने सगळे सारखेच आहेत. या वर्गात असणारी राजकीय मंडळी व जनता यांच्यातील दरी कमी होणे गरजेचे आहे. त्यासाठी शालेय वयापासून या 'आचार संहितेचे' संस्कार व्हायला हवेत. आम्हांला हे बदलायचेच नसेल तर प्रश्नच येत नाही; पण मग स्वातंत्र्यपूर्व काळातील राजकीय सामाजिक क्षेत्रांतील नेत्यांची नावे उच्चारण्याचा 'किमान नैतिक अधिकारही' आम्हांला उरणार नाही.

●●●




वर्ष बारावे / अंक ११ / नोव्हेंबर २०११

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
श्री. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १६ वे/अंक ५ वा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे – ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
Email : perfectprints@gmail.com

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | प्रादेशिक सैन्य अधिकारी व डॉ. वा. ना. बेडेकर | – श्री. मा. ना. पाटील | ३ |
| २) | राणी चुडाला | – श्री. नरेन्द्र नाडकर्णी | ५ |
| ३) | भारतीय संस्कृती – बीज, मॉडेल व साधना | – श्री. यशवंत साने | ९ |
| ४) | अमेरिकेत माझी मराठी मंडळात भगवद् गीतेवर प्रवचने | – श्रीमती आशा भिडे | १५ |
| ५) | तपस्येचे फळ | – श्री. यशवंत माने | १८ |
| ६) | होहोट: चीनमधील ऐतिहासिक आणि सांस्कृतिक शहर | – डॉ. सुधाकर आगरकर | २० |
| ७) | भारतीय संस्कृतीचा मूळ पाया | – श्री. शं. बा. मठ | २४ |
| ८) | परिसर वार्ता | – संकलित | ३० |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- अभ्यासपूर्ण लेखांसाठी हे व्यासपीठ आहे.
- दिशा चे उद्दिष्ट विचारप्रर्वतक लेखांना व्यासपीठ पुरवावे हे आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: वर्गणीदार व्हा, इतरांना वर्गणीदार व्हायला सांगा.
- आपण वर्गणीदार असाल तर, आपली वर्गणी भरायची राहिली नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात वर्गणी, लेख पाठवावयाचे असतील तर
  कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर नौपाडा, ठाणे ४००६०२
- या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या
- प्रमुखांनीही आपल्या संस्थेची वर्गणी पाठवावी.
- www.vpmthane.org या संकेत स्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक वर्गणी रु. २५०/- धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.

– संपादक

# प्रादेशिक सैन्य अधिकारी व डॉ. वा. ना. बेडेकर

*२४ तास सेवा तत्पर अरणाऱ्या पिढीतील ऋषितुल्य डॉ. वा. ना. बेडेकर यांचा आठवणीत राहिलेला अनुभव – संपादक*

प्रादेशिक सैन्यातील एक अधिकारी आणि डॉ. वा. ना. बेडेकरांची नि:स्पृह सेवा या विषयावरचा हा लेख आहे. वैद्यकीय व शैक्षणिक क्षेत्रांत कोणत्याही वेळी आणि कोणतीही सेवा करताना डॉ. वा. ना. बेडेकर कोणतीही पर्वा न करता सेवेसाठी मागे पुढे पहात नसत, हे बहुतेकांना परिचित आहे.

वरील विषयावरचा लेख एका घडलेल्या प्रसंगावरचा आहे. त्यासाठी प्रथम प्रादेशिक सैन्याविषयी थोडी माहिती. भारत देशाच्या संरक्षण योजनेकरिता भूदल, हवाईदल, आणि नौदल सागरीदल अशी व्यवस्था आहे. याशिवाय महाराष्ट्र राज्याने भूदलाच्या मदतीसाठी प्रादेशिक सैन्य दलाची योजना राबविली आहे. शिवाय जोडीला शैक्षणिक विभागात एन.सी.सी. आणि नागरी जीवनात होम गार्डस यांचीही व्यवस्था राबविली आहे. प्रादेशिक सैन्यामध्ये प्रामुख्याने महाराष्ट्र राज्यातील सरकारी कर्मचारी व इच्छुक नागरिकांमधून सैन्य भरती करण्यात आली होती. प्रादेशिक सैन्याला टेरीटोरीयल आर्मी असे नाव आहे. या लेखाच्या शीर्षकामध्ये जो प्रादेशिक सैन्य अधिकारी संबंधित आहे तो या टेरीटोरीयल सैन्यात आहे.

भूदलाचे एक कर्नल यांच्या अधिपत्याखाली प्रादेशिक सैन्याची स्थापना ११९४८–४९ मध्ये प्रथम मुंबई मध्ये झाली. मुंबईला मेट्रो सिनेमाजवळ लष्कराची एक इमारत आहे. तेथे १९४८ ते १९५५ या काळात टेरीटोरियल रियल आर्मीचे हेड ऑफिस होते व शेजारच्या क्रॉस मैदानावर सैन्याच्या सैनिकी कवायती व शिक्षण होत असे. (109 INF.B.N.T.A) अशी आद्याक्षरे त्यासाठी वापरात होती. सुमारे १००० सैनिक आणि चार कंपन्या येवढ्या स्वरूपात बटायालिन योजना चालत होती. पाकीस्तान बरोबर पहिले युद्ध झाले. तेव्हा या प्रादेशिक सैन्याने भूदलाला जरुर ती मदत पुरविली होती. १९५५ नंतर मुंबईमधून सदर योजना बंद करुन कोल्हापूरला बदली करण्यात आलेली आहे. चार कंपन्यांपैकी A कंपनीचे प्रमुख श्री. सेन म्हणून एक बंगाली गृहस्थ होते. तेच या लेखातील संबंधीत व्यक्ती होय. विद्या प्रसारक मंडळाच्या ७५ वर्षाच्या इतिहासात या लेखातील प्रसंग वर्णनाचा उल्लेख केलेला नाही. तो या दिशा अंकात करण्याचा प्रयत्न आहे.

१९६८–१९६९ मध्ये विद्या प्रसारक मंडळाने ठाण्यामध्ये पहिले महाविद्यालय सुरू करण्याचा प्रकल्प हाती घेतला तेव्हा पुणे विश्व विद्यालयाने मंडळाकडे असलेल्या जागा, आर्थिक क्षमता आणि सुविधा यांचा विचार करून सुरुवारीस फक्त वाङमय व वाणिज्य विभागाची परवानगी दिली होती त्याच बरोबर आर्थिक क्षमता जर लवकर वाढली तर विज्ञान विभागाचीही परवानगी देण्याचा विचार करू असे कळविले होते. म्हणून त्याचा विचार करुन अर्थ व्यवस्था वाढविण्यासाठी मंडळ विचार करीत होते. तेव्हा ऑक्टोबर १९६८ मध्ये माननीय भाऊसाहेब बांदोडकरांना देणगीसाठी भेटण्याकरिता व इतर बाबीवर विचार विनिमय करण्यासाठी डॉ. वा. ना. बेडेकरांनी त्यांच्या नारायणभुवन बंगल्यामध्ये रात्री १० च्या सुमारास खास बैठक बोलविली होती. बैठकीला विद्या प्रसारक मंडळाचे सभासद व काही हितचिंतक व्यक्ती बोलविल्या होत्या. बैठकीचे काम म्हणजे गोव्याला

श्री. भाऊसाहेबांशी संपर्क साधणे व इतर बाबींवर चर्चा करणे इत्यादी चालले होते. मुख्यकाम म्हणजे गोव्याला श्री. भाऊसाहेबांनी देणगी देण्याचे आश्वासन देऊन डॉ. वा. ना. बेडेकर व श्री. गुणाकर जोशी यांना भेटीस या म्हणून तारीखही कळविली होती. सर्वजण चर्चेत मग्न झाले होते. तेवढ्यात २-३ व्यक्ती गडबडीत तेथे आल्या. डॉ. वा. ना. बेडेकरांना बाजूला घेऊन त्या काही बोलल्या. डॉ. वा. ना. बेडेकर धोतर आणि गंजीफ्रॉक घातलेल्या वेषांत होते. ताबडतोब डॉक्टर त्यांची व्हिजीट बॅग व स्टेथोस्कोप घेऊन त्या व्यक्तीबरोबर धावत निघाले. आम्हांला काहीही बोलले नाही. आम्ही सर्वजण सुमारे १ ते दीड तास डॉक्टरांची वाट बघत बसलो होतो. इतका वेळ झाला तरी डॉक्टर बेडेकर परत आले नाहीत म्हणून काही व्यक्ती निघून गेल्या. मी आणि माझे शेजारी श्री. आमले दोघेजण डॉक्टरांचा शोध घेत गोखले रोडवर आलो तेव्हा लक्ष्मीनारायण मंदिरासमोरच्या इमारतीमध्ये काही लोकांची वर्दळ दिसली. काय गडबड आहे म्हणून मी व आमले त्या इमारतीमध्ये शिरलो. तेव्हा आतल्या बाजूस व्हरांड्यात लोकांची गर्दी व डॉ. बेडेकर एका व्यक्तीला तपासत होते. ते दिसले. ती व्यक्ती होती श्री. सेन प्रादेशिक सैन्य कंपनी A चे प्रमुख.

१९४८ ते १९५२ या काळात मी प्रादेशिक सैन्य दलात A कंपनीत एक सैनिक होतो. त्यामुळे मी सेन साहेबांना चांगला ओळखत होतो.

श्री. सेन मुलुंडमध्ये रहात होते. ठाण्यात गावदेवी मैदानामध्ये नवरात्री च्या दिवसांत बंगाली समाजातर्फे दुर्गा पूजा समारंभ होत असे त्या समारंभासाठी श्री. सेन ठाण्यात आले होते. त्यांना हार्ट अॅटक आला होता आणि ते रस्त्यात पडलेले होते. त्यांना काही व्यक्तींनी लक्ष्मीनारायण देवळासमोरच्या इमारतीमध्ये आणले होते आणि डॉ. बेडेकर माहिती असल्यामुळे ते लोक डॉक्टरांना घेऊन गेले होते. मी सेनबाबूंना ओळखत असल्यामुळे डॉ. बेडेकरांच्या सल्ल्यानुसार स्पेशल टॅक्सी करून त्यांच्या घरी नेऊन नातेवाईकांच्या हवाली केले. त्यांचे सर्व नातेवाईक त्यांची वाट बघत होते.

अशी एकंदर सर्व घटना अजून माझ्या चांगली स्मरणात आहे.

**मा. ना. पाटील**
ज्येष्ठ सदस्य व मार्गदर्शक
विद्या प्रसारक मंडळ

●●●

**घर बदलताना**

**शैलाची बदली झाली. त्यामुळं नव्या गावात नव्या जागेत आता ती निघाली होती. साहित्य भरताना नेहमीप्रमाणे घाई झाली. पॅकिंग कंपनीचे लोकही तिला भेटले नाहीत, त्यामुळे सगळं स्वत:चं करावं लागलं. आणि व्हायचं तेच झालं. न्या घरात कोणतंच सामान वेळेवर सापडेना. घर म्हणजे गोंधळ झाला. तिनं असं करायला हवं होतं १) साहित्य नेण्यापूर्वी किमान पंधरा दिवस आधी साहित्य बांधण्याची तयारी करायला हवी. २) जादाचे कपडे, क्रोकरीसारखे साहित्य, टेबल किंवा इतर रोज न लागणाऱ्या वस्तू व्यवस्थित पॅकिंग करून ठेवाव्यात. ३) पॅकिंगसाठी मोठे बॉक्स किंवा पोती वापरावीत, म्हणजे एकाच बॉक्समध्ये भरपूर साहित्य बसेल. त्या बॉक्सवर क्रमांक टाकावेत. यासाठी स्टेशनरीमध्ये कोरे स्टिकर्स मिळू शकतात. बॉक्सचा क्रमांक आणि प्रत्येक बॉक्समध्ये काय ठेवले आहे, याची एका वहीत नोंद करा. ४) सामान उतरवून घेताना यादीनुसार त्याची विभागणी करा.**

**- संग्रहातुन**

# राणी चुडाला

*समग्र जीवनाचा स्वीकार करून तपस्येचा मार्ग चोखाळणाऱ्या राणी चुडालाचा हा लेख*

प्रवचनाची वेळ झाली होती. वटवृक्षाच्या छायेत सारे शिष्यगण मांडा ठोकून बसले होते. अत्यंत प्रसन्नचित्ताने आलेले गुरुदेव पारावरील आपल्या जागेवर स्थानापन्न झाले आणि शिष्यवर्गाकडे एक नजर टाकून म्हणाले – '' मी आज तुम्हांला एक सुंदर कथा सांगणार आहे. कथा तशी जुनीच आहे. फारशी प्रसिद्धही नाही. मात्र आध्यात्मिक ज्ञानाच्या दृष्टिकोनातून अत्यंत उद्‌बोधक आहे.

गुरुजींच्या या उक्तीतून सर्वांना समजले की आज जरी नेहमीप्रमाणे प्रवचन नसलं तरी कथेच्या माध्यमातून ते प्रवचन साकार होणार आहे.

गुरुवर्यांनी कथेस सुरुवात केली ''फार फार प्राचीन काळी चुडाला नावाची एक थोर आत्मज्ञानी स्त्री होऊन गेली. कोसंबी प्रदेशाचा राजा शिखिध्वज याच्याशी तिचा विवाह झाला होता.''

गुरुजींना थांबवून मध्येच एक शिष्य म्हणाला ''गुरुजी, पण चुडालाला जर आत्मज्ञान प्राप्त झालं होतं तर तिने विवाह तरी का केला?''

गुरुजी म्हणाले – ''तुझा प्रश्न योग्य आहे. पण चुडालाचे विचार समजून घेतले तर ही शंका राहणार नाही. मुळात आत्मज्ञान प्राप्त करण्याचे दोन प्रमुख मार्ग असतात.

त्यातला एक मार्ग असतो तो Withdrawal from the Universe चा म्हणजे हे सारं जग, यातील जीवन यांना सामोरे जावे लागणारे सुख, दुःख संघर्ष या साऱ्या गोष्टींकडे पाठ फिरवून वैयक्तिक मोक्ष प्राप्तीसाठी सर्वसंग परित्याग करुन यतिवादाचा अंगीकार करण्याचा.

तर दुसरा मार्ग असतो Perfection in the Universe चा, तपस्येचा. समग्र जीवनाचा स्वीकार करून त्यातूनच स्वत:ची प्रगती साधणारा.

पहिल्या मार्गाने जाणारा सिद्ध झाला तरी अस्तित्वातील परमेश्वराला हरवून बसतो. आणि दुसऱ्या मार्गाने जाणारा अस्तित्वाची पूर्तता देवत्वांत करून सिद्ध बनतो.

चुडाला ही दुसऱ्या मार्गाने गेलेली होती. सांसारिक आणि ऐहिक जीवन एका निराळ्या वृत्तीने तिला जगायचं होतं. पारमार्थिक ज्ञान प्रकाशाने नित्याचे जीवन उजळून टाकावे अशी तिची इच्छा होती.

बाह्य जगातील दुष्ट अनिष्ट आणि कटु प्रवृत्तींची शुद्ध आनंदस्वरूप चिरंतनाशी सांगड घालणं अशक्य वाटत असल्यानं या जगापासून दूर जाऊन आंतरिक शांति, आनंद स्वत: पुरता प्राप्त करुन घेणं हा चुडालाला पलायनवाद वाटत होता. आणि या वृत्तीमुळेच एका परीने आपण या जगातील अज्ञान, दु:ख आणि अपूर्णता यांना मान्यता देत असतो असे चुडालाला वाटे. आपल्या आंतरिक जीवनाच्या सुगंधाने बाह्य जीवनाचे रूपांतर होऊन ते मांगल्याचे मंदिर बनावे म्हणून कार्य करण्याचा तिचा दृढ निश्चय होता.

चुडाला ही रुपवती आणि ज्ञानवती होती. मात्र शिखिध्वज हा तिच्या आंतरिक तेजापेक्षा अनेकदा आपल्या इच्छा बाजूला ठेवून ती राजाच्या मर्जीप्रमाणे वागत असे. त्याने उत्तम राज्यशासन करावे आणि प्रजेचे कल्याण करावे अशी तिची इच्छा होती.

एक शिष्य गुरुवर्यांना मध्येच म्हणाला – ''पण गुरुजी, चुडाला आत्मज्ञानी होती तर मग तिनें राजाला उपदेश नाही का केला ?''

गुरुजी म्हणाले – ''तुझी शंका रास्त आहे. पण ध्यानात ठेवा. प्रत्येक गोष्टीला नेहमी वेळ यावी लागते. प्रत्येकाच्या विकासासाठी योग्य काळ हा एक महत्त्वाचा काळ असतो. आपण बीज पेरतो त्यावर पाणी शिंपडतो पण अंकूर फुटण्यास योग्य तो काळ लागतोच. बरं पुढे त्यानंतर रोप तयार झालं तरी त्याला बहर येण्यास योग्य काळ जावाच लागतो.

उपदेश ग्रहण करण्याइतकी राजाची आतून तयारी झाली नाही याची तिला जाणीव होती. तसेच राजाच्या मनांत उच्च जीवनाची ओढ निर्माण व्हावी म्हणून ती त्याच्या नकळत हळुवारपणे त्याच्या जीवनाला आकार देण्याचा प्रयत्न करत होती. अशा रीतीने जवळ जवळ २० वर्षांचा काळ लोपला''

एक शिष्य – ''गुरुजी, म्हणजे चुडालाच्या प्रयत्नांचा राजावर काहीच परिणाम झाला नाही का ?

गुरुजी – ''मुलानों, तसं म्हणता येणार नाही कारण चुडाला काय करत होती? राजाच्या प्रगतीला पोषक असं वातावरण कायम राखीत होती. आणि प्रगतीला बाधक ठरणाऱ्या गोष्टी बिनबोभाट निपटून काढत होती.

मुळात मानवाची स्वत:ची इच्छाशक्ती जेव्हा कार्यान्वित होते तेव्हाच त्याच्या आध्यात्मिक प्रगतीला खरा वेग येतो. तोपर्यंत त्याची प्रगती चालूच असते पण ती प्रकृतीच्या संथ गतीनं आणि म्हणून तर योगी श्रीअरविंदाच्या विचारधारे प्रमाणे All Life is a Yoga and every being is a yogin whether consciously or unconsciously.

राजा शिखिध्वज नकळतच आत्मपरीक्षण करू लागला होता. आपल्या वागण्यात असलेल्या दिमाखाची, गर्वाची, त्याला जाणीव होऊ लागली होती. आपल्या प्रजेचं कल्याण करतो तेही आपल्या संतोषासाठीं, आपली कीर्ती सर्वदूर पसरावी यासाठी याची त्याला जाणीव होती होती. आपण करत असलेल्या परोपकाराच्या मागे सूक्ष्म अहंकार लपलेला असतो हे त्याच्या ध्यानात येऊ लागलं.

मानव जेव्हा आत्मपरीक्षण करू लागतो तेव्हा आपले अवगुण त्याच्या नजरेस येऊ लागतात. तो अस्वस्थ होऊ लागतो. जीवनात राहून या अवगुणांवर मात कशी करावी हे त्याला समजत नाही. आणि मग एक सोपा मार्ग त्याला दिसतो. या जीवनापासून दूर कुठेतरी अरण्यात पळून जावं म्हणजे आपली सुटका होईल असं त्याला वाटतं

शिखिध्वजालाही असाच या जीवनसंघर्षाचा त्यांतील उपभोगाचा उबग येऊ लागला होता. आणि मग एक दिवस कुणालाही न सांगता तो गुप्तपणे अरण्यात निघून गेला.

एक शिष्य म्हणाला – मग पुढे काय झालं? राणीनं काय केलं?

गुरुजी म्हणाले – '' राणीला कळलं होतं की राजाच्या जीवनातील ही एक तात्पुरती अवस्था आहे. जगाचा त्याग म्हणजे खरा त्याग नव्हे. "Escape brings not the victory and the crown!" आपल्या उच्चतम अशा स्वधर्माची, स्वकर्तव्य पालनाची जगात राहूनच परिपूर्ती करायची असते. हे तिला ज्ञात होतं. वैयक्तिक मोक्षप्राप्तीच्या इच्छेपाठीमागे सुद्धा एक प्रकारचा सूक्ष्म अहंकार दडलेला असतो हे ती जाणून होती आणि म्हणून तिने राजाच्या साधनेत व्यत्यय आणला नाहीं. घाईगर्दीत त्याला सत्याचा मार्ग दाखवण्याचा प्रयत्नही केला नाही. काही वर्षे तिने स्वत: समर्थपणे राज्यकारभार चालविला. आणि प्रजेला सुखी केलं.''

एक शिष्य म्हणाला – ''पण मग तिकडे राजाचं काय झालं?''

गुरुजी – ''तिकडे अरण्यात राजाची ध्यानधारणा, साधना चालू होती. पुढे चुडालाला तिच्या आंतरिक ध्यानावस्थेत असं दिसून आलं की राजाच्या ठिकाणी आता साधनेच्या पुढील पायरीसाठीं आंतरिक परिपक्वता आलेली आहे. चुडालाला गूढविद्येचे ज्ञान होते. त्यामुळे गूढ शक्तीच्या सहाय्याने तिनें राजाचे अरण्यातील ठिकाण शोधून काढले. आणि एक दिवस एका तरुण तेजस्वी तपस्विनीचे रूप धारण करुन सूक्ष्म शरीराने ती राजाकडे गेली.

एक शिष्य म्हणाला – '' का? त्याला मोहिनी घालण्यासाठी? का त्याची अन्य मार्गाने परीक्षा घेण्यासाठी?''

गुरुजी –''नाही ! तसे काहीच नाही त्या दोघांमध्ये जो संवाद झाला तो ऐका म्हणजे समजेल तुम्हाला.

तपस्विनीचे सात्विक रूप आणि तेज पाहून राजा प्रभावित झाला आणि म्हणाला – आपण कोण आहात?

ती म्हणाली – मी एक तपस्विनी आहे. पण या दाट अरण्यात तुम्ही काय करता? आपण कोण आहात?

राजा – मी राजा शिखिध्वज. राज्य आणि पत्नी यांचा त्याग करुन सर्व बंधनातून मुक्त होण्यासाठी साधना करत आहे.

तपस्विनी हसली आणि म्हणाली – काय म्हणालात? तुमच्या राज्याचा आणि तुमच्या पत्नीचा तुम्ही त्याग केलात? पण जी गोष्ट तुमच्या मालकीची नाहीं त्याचा त्याग तुम्ही कसा काय करू शकता? शिवाय तुम्ही राजे होता याचा राज्यत्याग केल्यावरही तुम्हांला अजून विसर तर पडलेला दिसत नाही.

राजा विचारात पडला व म्हणाला तुम्ही म्हणता ते बरोबर आहे. पण आता मी राहतो आहे ते ठिकाण सोडून देऊन मी सतत भ्रमण करायलाही तयार आहे.

तपस्विनी – पण ही जागाही परमेश्वराने निर्माण केली आहे ना? मग तिचा त्याग करण्यात काय अर्थ?

राजा – ठीक आहे तर मग. हा माझा पोशाख आणि हे एक पात्र एवढेच माझे आहे त्याचाही मी त्याग करतो.

तपस्विनी – आणखी काही?

राजा – माझी सर्व तपस्या. तिचे सर्व फलही मी सोडून द्यायला तयार आहे. एवढेच नव्हे तर हा माझा देह ज्याला मी माझा मानतो त्याचाही त्याग करण्यास मी एका पायावर तयार आहे. असे म्हणून राजा उठून उभा राहिला.

तेव्हा त्याला थांबवून तपस्विनी म्हणाली ''थांबा, तुम्ही तुमचे जीवन आणि देहही टाकून द्यायला तयार झालात. पण तुमच्या अहंकाराचे काय? तो न सोडता देह सोडण्याने तुम्ही काय मिळवणार? पुन: अंध:कारातच आणि अज्ञानात जन्म घेणार?मृत्यूने मुक्ती मिळत नाही. या जीवन नाट्यात जो अहं हा खरा सूत्रधार असतो त्याचा विलय झाल्यानेच मुक्ती मिळते. तुम्हांला खरोखरीच काही, मी उपभोग घेतो, मला दु:खक्लेश होतात या विचारांचा, या भावनांचा या वृत्तीचा त्याग करा.

खरं म्हणजे मानवानं कशाचाही त्याग करण्याची आवश्यकता नसते. कारण मुळात त्याग करण्यासाठी त्याच्याकडे त्याचं स्वत:चं असं काहीही नसतं. त्याचं मन, शरीर, प्राणशक्ती हे सारे त्या वैश्विक प्रकृतीचे भाग असतात.

मात्र तरीही त्याच्याकडे त्याग करण्यासाठी एक गोष्ट निश्चित असते आणि ती म्हणजे – आपण स्वतंत्र आहोत, इतरांहून वेगळे आहोत ही भावना. या भावनेचा त्याग अवश्य करायला हवा. शिवाय हव्यासापोटी तो ज्या असंख्य गोष्टींचा संग्रह करत असतो त्या सर्व गोष्टी वस्तुत: त्या चिरंतनापासून निर्माण झालेल्या वैश्विक योजनेचा भाग आहेत, हे उमजून त्या वृत्तीचा त्याने त्याग करायला हवा.

परमेश्वर सत्य आहे आणि त्याने निर्माण केलेलं हे जगही सत्य आहे. त्याचा समग्र स्वीकार करूनच मानवाला पुढे जायचं आहे. आणि त्यासाठी हा देह, त्यातील प्राणशक्ती आणि मन ही साधनं परमेश्वराने मानवाला दिली आहेत. त्याने दिलेल्या प्रत्येक गोष्टीला नष्ट करुन नव्हे, तर पूर्णत्वाला नेऊनच त्याच्याशी एकरूपता साधता येईल.

अहंकाराचं रुपांतर दैवी चेतनेत होईल अज्ञानाचं रूपातर दैवी ज्ञानात होईल, क्षणिक सुख आणि दु:ख यांचे रूपातर दैवी परमानंदात होईल. जीवनात समत्व प्रस्थापित होईल.

राजाच्या मनात लख्ख प्रकाश पडला होता. तपस्विनिचे पाय धरण्यासाठी तो खाली वाकला. पण ती अंतर्धान पावली होती.

एक शिष्य म्हणाला – मग राज्य करण्यासाठी राजा परत आला का?

गुरुजी – होय! त्याला कळून चुकले होते की ज्या स्वातंत्र्याचा, ज्या मुक्तीचा तो शोध घेत होता ती दुसरीकडे कोठे ही नव्हे तर स्वत:च्या अंतरंगात शोधायला हवी. राणी चुडाला त्या दृष्टीने आदर्श असे उदाहरण होते. ती आतून पूर्ण अनासक्त, पण बाह्यत: पूर्ण कार्यरत होती.

कालांतराने राजालाही आत्मज्ञान प्राप्त झाले. आणि त्या दोघांनी मिळून 'सर्वांभूती परमेश्वर' या भावनेने प्रजापालन करुन राज्य केले.

**श्री. नरेन्द्र नाडकर्णी**
सीडी. १०१, सी. १,
श्रीरंग सोसायटी, ठाणे.
दूरध्वनी – २५३३३१६०
E mail : nd_nadkarni@yahoo.com

●●●

## चिंतन

संस्था ही कोणतीही असो,
सरकारी, सहकारी, खाजगी वा धर्मार्थ,
संस्थेत ठरावीक काम करणे,
हा झाला कायदा.
पण कामात स्वत:ला झोकून देणे,
ही झाली नैतिकता.
मी पगार घेतो म्हणून काम करतो,
हा झाला व्यवहार.
संस्थेच्या अस्तित्वाची, सुरक्षिततेची, प्रतिष्ठेची
योग्य काळजी घेण्याचे कार्य
मला पार पाडावयाचे आहे,
ही झाली आपुलकी.
संस्थेची प्रगती आहे तोवर माझे अस्तित्व कायम आहे.
माझी प्रतिष्ठा आहे म्हणून संस्थेला हानिकारक ठरेल,
अशी कृती मी कधीही करणार नाही.
पण सामाजिक ऋण फेडण्याच्या भावनेने,
स्वत:ला कामात वाहून घेईन.
ही प्रत्येकाची भावना असली पाहिजे,
यातच देशाचा विकास व स्वत:चा उद्धार आहे.

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना

*राजकारण व अध्यात्मशास्त्र यांचा अन्योन्य संबध भारतीय संस्कृतीतील दैविक शास्त्र संदर्भ विशद करणारा लेख – संपादक*

**प्रास्ताविक**

१) टाईम्स ऑफ इंडियाच्या वर्तमानपत्रात 'The Speaking Tree' म्हणून एक स्तंभ (Column) आहे. तो १६/९/२०११ चा लेख एका मौलानाने लिहिला आहे. २) आदेश बांदेकरच्या **‘होम मिनीस्टर’** झी. टी व्ही मध्ये तो आतां प्रत्येक वहीनीला प्रश्न विचारतो. पण त्यांची उत्तरे देताना एकही इंग्रजी शब्द आला तर वहीनींचा १०० रुपयांचा तोटा होतो. माझ्या लेखात हे कठीण आहे टाकणे. या दोन गोष्टीचा संदर्भ पुढे येतो आहे.




**The Speaking Tree'**

**भाषाशास्त्राच्या ज्ञान मर्यादा**

या विषयासारखे तसेच काहीसे धक्का देणारे विचार मनात येतात. ‘होम मिनीस्टर’, हा इंग्रजी शब्द आहे. तेव्हां बांदेकरच्या हातातून ‘तथास्तू’ पुणे ह्यांची पैठणी साडी हिसकावून घ्यावयाला हवी.

तसेच, माझ्या लेखाच्या **शीर्षकात ‘मॉडेल’ हा शब्द आल्याने मलाही कोणीतरी ‘शीर्षक बदला’ असे फर्मावून सांगावयाला हवे** नाही कां?

पण, ज्ञान हे पूर्णपणे लिखित भाषेमध्ये सामावू शकते का? संस्कृत सोडून इतर सर्व भाषा ह्या फक्त मानवी संवादासाठी आहेत. मानव विचारांची अशी वित्कळीत पूर्वग्रह दूषित अवस्था का असते? पण, आपल्याला मानवी भाषे पलीकडच्या ‘आत्मिक’ स्तरावर जावे लागणार आहे.

**‘युनानी’ औषध ‘भ्रष्टाचाराला’**

मी सुरुवात केली तेव्हाच मौलाना वहीउद्दीन खान यांच्या "How to eradicate corruption" ह्या ‘बोलणाऱ्या वृक्षाच्या’ 'The Speaking Tree' स्तंभातील लेखाचा संदर्भ घेतला होता. ‘‘भ्रष्टाचार कसा निपटून टाकावयाचा’’ हा त्याचा विषय आहे.

ते म्हणतात, की, ‘‘हे काम करावयाला अशा व्यक्ती लागतील की त्या चिरकाल व नेहमी अभ्रष्ट असतील आणि हे काम व अशा व्यक्ती निर्माण होण्यासाठी निर्विवादपणे "Spirituality" अध्यात्मशास्त्रालाच हे शक्य आहे.’’

मग ह्या कुंजिकातुल्य अध्यात्मशास्त्रावर जगात कोणाचे खरे प्रभुत्व आहे? विवेकानंद, अरविंद, दयानंद हे भारतातच उत्पन्न व विकसित झाले असे सांगाताहेत. पण,

दुर्दैवाने अनेक जणांना ह्या **'अध्यात्मशास्त्राचे'** वावडे आहे. विशेषतः युरोपियन संस्कृतीमधील बुद्धिवाद स्वीकारलेल्या अत्यंत प्रामाणिक मित्रांनाही 'अध्यात्मशास्त्राची तरफदारी बिलकूल पसंद नाही. ही मंडळी पुष्कळशी हिंदू व भारतीय संस्कृतीला अभिवादन करणारी आहेत. पण, त्यांचा बुद्धिभेद चालू आहे व ते सध्या पूर्वग्रही 'गॉगल' लावून बसले आहे.

त्यामुळे, एका मुस्लीम मौलानाने हे कडू औषध द्यावे हे त्यांना तरीही आवडणार नाही. पण समर्थ रामदास संत ज्ञानेश्वर, विवेकानंद किंवा तुकारामाने सांगितलेले आध्यात्मिक 'डोस' सुद्धा ज्यांना लागू पडत नाहीत. त्यांना हा 'युनानी' औषध प्रयोग कसा रूचणार?

**भारतीय सांस्कृतिक ठेव्यावर हल्ले**

सध्या 'रामायणावरील' रामानुजाचा निबंधा' वर जो वाद चालू आहे, त्यावर भाष्य करताना श्रीमती जलबाला वैद्य लिहिताहेत :-

"No one disputes' the intellectual caliber of Ramanujan's essay, **but where is the Soul of the epic in this academic effort."**

''कोणीही रामानुजमच्या बुद्धीच्या तल्लख श्रेणीवर संशय वा शंका घेणार नाहीत. पण, या पांडित्यपूर्वी शैक्षणिक निबंधात ह्या महाकाव्यातील आत्म्याचा संदर्भ कोठे आहे?''

त्यामुळे, मौलाना ह्यांच्या प्राथमिक पद्धतीच्या 'युनानी' औषध योजनेत 'वेदिक सत्याचा' व 'वेदिक ज्ञानाचा' संदर्भ मला कुठेचे सापडला नाही पण, जलबाला वैद्य म्हणतात कीं हिंदू धर्म (वेदिक सनातन धर्म) हा जास्त करून **मानवाचा स्वत:च्या अस्तित्वाचा व त्याच्या वैश्विक रचनेच्या नात्याचा शोध आहे.** त्यामुळे आपली सहा दर्शने कट्टर चार्वाकाच्या भौतिकवादा पासून ते सांख्य, वैज्ञानिक,न्याय,बौद्ध व वेदांत या तऱ्हेच्या ६ दर्शनांचा विश्वासाने संभाळ करतात. हा स्तुत्य प्रयत्न व पारदर्शिक सत्यशोधाचे भारताचे एक जागतिक उदाहरण आहे नाही का? ह्या तत्वज्ञानांना ते 'दर्शन' म्हणतात. हे अपौरूषेय परिपूर्ण व अंतिम सत्य नव्हे.

जागतिक स्तरावर ह्या **'ज्ञान शोधात'** दोन दृष्टि कोन आहेत.

1) Man is a Social animal
2) Man is a Spirstual being and its present status is Transirtional

याचा अर्थ :- १) माणूस हा सामाजिक प्राणी आहे. २) माणूस हा जीवात्म्याचा मर्त्य शरीरबद्ध रूप आकारात सामावला आहे. शिवाय तो एका 'संक्रमणाअवस्थेत' आहे.

**मानवी स्वरूपातील अस्तित्वाचे स्वरूप**

मग ह्या मानवाचे भाविष्य काय आहे?



१) भगवद्‌गीता म्हणते त्या मर्त्य माणसाला 'पुरुषोत्तम' योगमार्गाने व्हावयाचे आहे.

२) श्री. प. पुज्य गोळवलकर गुरुजी म्हणतात की त्याने 'परिपूर्ण' माणूस बनणे हा हेतू व उद्देश आहे.

३) महायोगी अरविंद घोष म्हणतात की हा शरीरबद्ध आत्मा एका दैवी जीवनाकडे प्रवास करतो आहे. "Life Divine" हे त्याचे ध्येय आहे.

४) उपनिषदे म्हणतात की ह्या 'अपरिपूर्ण माणसापुढे एक मार्गदर्शक घोषणा आहेः-

''असतो मा सत् गमय

तमसो मा ज्योतिर्गमय

मृत्योर्मा अमृतम् गमय''

असा प्रकाश टाकणारा वैश्विक दीपस्तंभ आहे व त्या प्रकाशात त्याचा म्हणजे शरीरबद्ध जीवात्म्याचा म्हणजे शरीरबद्ध जीवात्म्याचा जन्म, मृत्यू, पुनर्जन्म असा अनंत चक्राकार प्रवास चालू आहे.

**भ्रष्टाचाराचा कॅन्सर**

मग या अपरिपूर्ण व दोषयुक्त माणसाकडून सध्याच्या समाजाला ग्रासणाऱ्या 'कॅन्सर' सदृश रोगी भ्रष्टाचाराचा प्रतिकार कसा होणार? भ्रष्टाचार काय फक्त पैशापुरताच मर्यादित आहे. त्याचे मूळ मन: प्रवृत्तीत आहे. ह्याकरिता दोन स्तरावर मार्ग आखावयाला लागतील

१) ह्या मानवाचा स्वतःच्या परिपूर्णतेकडचा अभ्यासक्रम, वा संस्कारक्रम योजनाबद्ध रीतीने समाजाने अंगावर घेणे. हा होय!!

२) ह्या मध्यम अवस्थेतील माणसाच्या समाज घटकाकडून सामाजिक, राजकीय, आर्थिक व इतर स्तरावर चळवळ उभारणे आवश्यक ठरेल.

**चळवळीला राजकीय मर्यादा**

मग ह्या उपक्रमाला ज्या चौकटीत काम करावयाचे ती चौकट, म्हणजे ''राज्यटघटना, लोकशाही, जागतिक अर्थजीवन व आंतरराष्ट्रीय स्तरावरील शक्तिंशी सामना.''

**राजकीय चौकट आत्म उद्धाराला विरोधात्मक**

ही चौकट पूरक आहे की विरोधात्मक अज्ञानावर आधारित आहे? ह्याचा अर्थ वैयक्तिक आत्मउद्धाराचा मार्ग व त्याचबरोबर 'राज्यशास्त्राला अनुसरून सामाजिक लढा हा कार्यक्रम अनुसरावा लागेल. ह्या चौकटीत बदल घडवणे आवश्यक ठरेल. हा बोध आवश्यक आहे.

हा विस्तारित कार्यक्रम अनुसरवा लागेल. ह्या चौकटीत बदल घडवणे आवश्यक ठरेल.

ह्या कार्यक्रमाला केवळ 'राजकारण' असे म्हणता येईल का व तसे असल्यास ह्या राज्यशास्त्राची व तत्वज्ञानाची बैठक कोणती योग्य आहे?

आज भारत आपली सांस्कृतिक सामाजिक व्यवस्था गमावून बसला आहे. खऱ्या 'उद्धारासाठी' ह्या चौकटीला व समान व्यवस्थेला पूरक स्वरूपात उभारावयाला लागेल. जागतिक स्तरावर नजीकच्या काही शतकांच्या इतिहासात ''कम्यूनिझम'' व 'कॅपिटॅलिझम' ह्या दोन तत्वज्ञानाचा प्रभाव जगातील निरनिराळ्या देशांत पडला.

आज समाज सत्तावादाची दोन मॉडेलस् म्हणजे रशिया व चीन ही अस्ताव्यस्त स्वरूपात मोडकळून पडली आहेत - त्याच्या साम्यवादी व समाजवादी - तत्वज्ञानावर आधारलेल्या राज्यसंस्थाची 'पराभूत स्थिती' पहावयाला लागते आहे. एवढेच नव्हे, तर 'भांडवलदारी' समाजपद्धतीला त्यांनी ठासून विरोध केला, त्याच भांडवलदारी समाजपद्धतीचा त्यांनी उघड वा छुप्या पद्धतीने स्वीकार केला आहे.

त्याच्या दुसऱ्या बाजूला 'भांडवलदारी समाजव्यवस्थाचे श्रेष्ठ व यशस्वी दर्शन म्हणून समजल्या जाणाऱ्या अमेरिकन राष्ट्राची व त्यावर विसंबून असलेल्या मांडलिक अवस्थेतील युरोसमाजपद्धतीची हलाखीची परिस्थिती आली आहे. बेकारी व अर्थकारणाचा डोलारा

उन्मळून पडलेली अवस्था अशी त्या राष्ट्रांची स्थिती आहे. 'Wall street' चळवळ ही Global Level ला त्या पराभवाचे दृश्य दाखवत आहे. ह्या भांडवलदारी मूळ समाजव्यवस्थेची दोन अत्यंत विकृत स्वरुपे "Crony Capitations" व "Casino Capitalism' ह्या अवस्थेत आहेत. ह्याचा सरळ अर्थ हा आहे की, "There is a Poverty of Ideological base for state Adminiotration of the Nations." म्हणजे जगातील देशांना तत्वज्ञानावर आधारलेल्या राज्यपद्धतीत अत्यंत अभावात्मक दरिद्री अवस्था आली आहे.'' पण, मग भारतात काय अवस्था आहे? आपले राजकीय सरकार तर केवळ अनुकरणात दंग आहे. त्याला स्वत्व बिलकूल नाही!!

हे राज्यशास्त्र धर्माला तडीपार करून, फसवी लोकशाही, भ्रष्टाचारी समाज व 'युरोपियन जीवन सांस्कृतिक, वैचारिक, अनुकरण व आध्यात्मिक ज्ञानाला रामराम ठोकून विस्मरून एका विस्कळीत, भ्रमावस्थेत केवळ कालचे पान उलटून त्याचाच किसा आज मिरवून एका निश्चित अधःपाती व विनाशाची वाटचाल करीत आहे!! दुर्दैवी स्थिती आहे.

अशा अवस्थेत असलेला भारतीय समाज व राजकारण काय मार्ग काढणार? तेव्हा हा भ्रष्टाचार सगळा समाज पोखरून टाकावयाला निघाला असताना, त्याचा प्रतिकार करणारे नेतृत्व कोण करणार? कोणते तत्वज्ञान वा शास्त्र करणार, याचा शोध खरे म्हणल्यास युद्धपातळीवर व्हावयाला हवा.

पण, चिखलात आकंठ बुडलेल्या माणसाची धडपड जशी त्याला आणखी खोलातच बुडवत जाते. तशी या भारतीय समाजाची व त्याच्या राजकीय व सामाजिक नेतृत्वाची अवस्था झाली आहे. उलट, एक दिव्य वैश्विक आध्यात्मिक 'दीपस्तंभ' आपला प्रकाश नित्यनेमाने वैश्विक करत आहे, पण त्या दीपस्तंभाकडे ह्या देशाचे जहाज चालवणाऱ्या 'कॅप्टनचे' पूर्ण दुर्लक्ष आहे–नव्हे त्याने आपले डोळे गांधारीसारखे बांधून टाकले आहेत. त्याला 'Navigation' समुद्र मार्ग शास्त्राचा पत्ताच नाही.

त्याचे मुख्य कारण म्हणजे आजकाल एक गैरसमज दृढ होताना दिसतो आहे की राजकारणाचा 'अध्यात्मशास्त्राशी' काही ही संबंध नाही!! हा पूर्वग्रह परकीय तत्वज्ञान, शिक्षणपद्धती व राजकीय चौकट स्वीकारलेल्या भारतीय समाजपद्धतीत रूतला आहे. पण, ह्या दृष्टिकोनातील मोठा दोष हा प्रतिकात्मक 'माणूस व विशेषतः भारतीय मानव' ह्याच्या त्याच्या खऱ्या अस्तित्वाबद्दलच्या अज्ञानी आहे. ह्या अज्ञानाची गोधडी व घोंगडी आपली शिक्षण पद्धती नवीन युवा पिढीवर दृढपणे सतत लादत आहे. काय मार्ग आहे आता?? आपण सुरुवातीला 'मानव' ह्याची जी व्याख्या करत होतो, त्याची सत्यस्थिती ही आहे की हा भारतीय मानव एका थोर आध्यात्मिक संस्कृतीचा वारसे आहे. ह्या अध्यात्माबद्दल ब्रिटीश व त्यानंतर आलेल्या सरकारांनी जाणीवपूर्वक पूर्वग्रह पसरविले आहेत. तसाच दोष प्रचलित धर्मस्वरूप व तत्वज्ञानांचेही आहे. हे अध्यात्म 'निवृत्तिपर' नसून 'प्रवृत्तीपरच' आहे. लो. टिळक यांनीही 'भगवद्गीते'च्या रहस्य कथनात 'कर्मयोग' हाच मार्ग सांगितला आहे असा खुलासा केला होता.



**लोकमान्य टिळक**

महायोगी अरविंद यांनी तर 'Integral spirituality' म्हणजे 'पूर्णयोगी अध्यात्म' असेच ह्या मार्गाचे वर्णन व अर्थ सांगितले होते. १५ ऑगस्ट १९४७ सालीच त्यांनी रेडिओवर जे भाषण केले त्यात त्यांनी भारताच्या गतवैभवाची, उच्च संस्कृतीची व त्याच्या आध्यात्मिक ध्येयांची जाणीव करून दिली. संपूर्ण स्वातंत्र्यांचे ध्येय समाजासमोर ठेवले. ह्या महान संस्कृतीची पुनर्स्थापना करण्याचे आवाहन केले होते. भारताला त्याच्या आध्यत्मिक राष्ट्रवादाच्या मार्गाची आठवण करून देऊन जगाला हे नेतृत्व करण्याच्या कर्तव्याची पुनर्स्मृती दिली. पण, हे करण्यासाठी समाजाची धारणा वैश्विक हेतूंशी सुसंगत करणाऱ्या शास्त्राची जरुरी होती. भारतापाशी अशा पृथ्वीवरील प्रकृतीमध्ये जीवन कंठणाऱ्या मानवाला प्रत्यक्ष व्यवहारात हे आदर्श अंमलात आणू शकणाऱ्या तत्वज्ञानात्मक बैठकीची शास्त्रशुद्ध राज्यशास्त्राची जरुरी भासत होती. पण, त्यासाठी प्राप्त सद्य काळात समाजातील धारणेची, संघर्षांची वस्तुस्थिती नव्याने ओळखण्याची आवश्यकता होती.



**महायोगी अरविंद**

काय होते असे राजकीय इतिहासातील संदर्भ? धार्मिक कलह, राष्ट्राराष्ट्रातील कलह होतेच, पण औद्योगिक क्रांती ह्या भौतिक विज्ञानावर आधारलेल्या उत्पादन पद्धतीतील भांडवलदार व कामगार ह्यामधील आर्थिक व सामाजिक कलहाने जगाच्या नाट्यरंगमंचावर प्रमुख स्थान पटकाविले होते. त्यामुळे, जगभार मानवी समाज. ह्या नवीन कलहाच्या उग्रतेने भारलेला होता. कार्ल मार्क्स ह्याच्या 'साम्यवादाच्या तत्वज्ञानातले निष्कर्ष आर्थिक विषयावर व त्यांतील अनैतिक शोषण पद्धतीवर प्रकाशझोत टाकणारे होते.

त्याच्या विश्लेषणात आर्थिक असमानता व वर्गकलह हे रोगाचे निदान होते. जवळ जवळ १०० एक वर्षे ह्या विचाराने जग ग्रासले होते व अजूनही त्या संक्रमणातून पुरते बाहेर पडलेले नाही.

काय बरोबर होते का हे समाजाचा अनारोग्याचे निदान?

समाजात भांडवलदार व कामगार ह्या जातीचे दोन वर्ग तयार झाले. औद्यागिक क्रांतीनंतर व त्यांच्या आर्थिक कलहाच्या बीजातून 'Class Conflict' वर्गकलह हा नवा रोग समाजाला लागला.

कार्ल मार्क्सचा गुरू हेगेल हा जर्मन तत्वज्ञ होता. पण त्याच्या Dialictical, thesis, antithesis a syntheses ह्या तत्त्वांचा स्वीकार करूनही मार्क्सने धर्म, स्पिरीट व आध्यात्म नाकारले. त्याची शिफारस पूर्णपणे भौतिकवादी व नफ्याच्या आर्थिक वाटपावर आधारलेली होती. Economics वर आधारलेली होती. यावर आधारलेले जैविक वा सामाजिक तत्वज्ञान सांगण्यापर्यंत त्याची मजल जाऊन राजसत्तेच्या स्वरूपावर Dictatorship of the Prolatariat म्हणजे कामगारांची पूर्ण सत्ता असे राज्ययंत्र हे त्याचे रोगावरचे औषध होते. हे निदान व औषध कसे चुकीचे होते हे विवेचन या लेखात मी करणार नाही आहे, कारण त्यावर पुष्कळ भाष्य उपलब्ध आहे व प्रसंगानुरुप व आवश्यकतेनुसार आपण त्याचे संदर्भ जरूर देऊ.

पण, मला जास्त महत्वाचे हे वाटते की कम्यूनिझम व कॅपिटॅलिझम ह्या दोन तत्वज्ञानांखेरीज काही राज्यशास्त्रीय तत्वज्ञान उपलब्ध आहे कीं नाही ह्याचा विचार करणे जास्त जरुरीचे झाले आहे. शिवाय, हा आधिकार खऱ्या अर्थाने भारतालाच आहे.

समाधानाची गोष्ट म्हणजे असा प्रयत्न पंडित दीनदयाल यांच्या 'एकात्म मानववाद' व 'एकात्म मानव दर्शन' ह्या स्वरूपांत निर्माण झाला आहे.

भारतीय जनसंघाच्या ए.बी. प्रतिनिधी सभेने संमत केलेल्या ह्या पंडित दीनदयाळ याच्या लिखाणाला हे प्रयोगात्मक प्रतिनिधित्व मिळाले आहे असे वाटते. भारतीय जनता पार्टीच्या बडोदा येथील अधिवेशनातही ह्या 'एकात्म मानव दर्शनाला' तात्विक स्थान मान्यता मिळाली असे वाचल्याचे आठवते.

आता या 'एकात्म मानव दर्शनाला' त्या जैविकशास्त्राची आध्यात्मिक बैठक लाभली आहे त्याचा सविस्तर विचार दिशाच्या पुढल्या अंकात करुया ही चर्चा दिशाच्या पुढील काही अंकातून चालू ठेवण्याचा माझा मानस आहे. तेव्हा जरूर वाट पहा.

**श्री. यशवंत साने**

सोनल अपार्टमेंट,
सारस्वत बँकेशेजारी,
अग्यारी लेन, ठाणे.
दूरध्वनी - २५३६८४५०
मोबाईल - ९००४०५१८४७
E mail : Saneyr@mtnl.net.in

●●●

## जगन्नाथाचे मंदिर

जगन्नाथ मंदिर हे अतिशय जुने आणि वास्तुशिल्पासाठी प्रसिद्ध मंदिर काही पुरातत्त्वज्ञांना सापडलेल्या ताम्रपटानुसार, या मंदिराचे बांधकाम कलिंगाचे सम्राट अनंतवर्मन चोदगंगा देव यांच्या कालखंडात सुरू झाले. हे मंदिर विविध भागांत विभागले असून, त्यातील जगमोहन आणि विमान हे भाग सन १०७८ ते ११४४ च्या दरम्यान बांधले गेले, असे सांगितले हाते. अर्थात, आज जे मंदिर दिसते, त्याची कल्पना अनंग भीम देव यांची होती. त्यांनी सन ११७४ मध्ये हे भव्य मंदिर बांधण्याचे आदेश दिले. सन १५५८ पर्यंत या मंदिरात जगन्नाथाची पूजाअर्चा नेहमीप्रमाणे सुरू होती; मात्र कालापहाड या अफगाणी घुसखोरीने ओरिसावर आक्रमण केल्यानंतर त्यातील मूर्ती अज्ञातस्थळी नेण्यात आल्या आणि रामचंद्र देव यांचे राज्य आल्यानंतर मंदिराला पूर्वीचे वैभव मिळाले आणि मूर्तींचीही पुनर्स्थापना करण्यात आली, असे सांगितले हाते. जगन्नाथांची प्रतिमा पुरीच्या समुद्रकिनाऱ्यावर सापडली आणि विष्णू आणि विश्वकर्मा हे दोघे कारागिरांच्या रूपात प्रकट झाले आणि त्यांनी लाकडातून कृष्ण, बलराम आणि सुभद्रा यांच्या मूर्ती कोरल्या, अशी आख्ययिका सांगितली जाते. महाराज रणजितसिंग यांनी अमृतसरमधील सुवर्णमंदिरापेक्षाही जास्त सोन्याचे दान या मंदिराला दिले, असे सांगितले जाते. रथरात्रा कधी सुरू झाली, हे स्पष्ट नसले, तरी सर्वसामान्यांनाही या देवांचे दर्शन घेता यावे, या दृष्टिकोनातून रथयात्रा सुरू झाली.

- संग्रहातून

# अमेरिकेत माझी मराठी मंडळात भगवद् गीतेवर प्रवचने

*अमेरिकेच्या वास्तव्यात गीतेवर केलेल्या प्रवचना संबंधातील अनुभवांचे शब्दांकन– संपादक*

सध्याच्या परिस्थितीत म्हणजे 'आर्थिक मंदी' 'स्वाईन फ्लू ची साथ व एकदंर सर्वच गोष्टींची अस्थिरता वगैरे सर्व असताना मला व्हिसा मिळून अमेरिकेत मुलाकडे यायला मिळालं हेच खूप होतं. कारण तोही इथे दोन वर्षापूर्वीच आला होता नि आणखी दोन तीन वर्षे राहणार होता, इथेच स्थायिक व्हायचा त्याचा व त्याच्या बायकोचाही विचार नव्हता. या आधी एम्. एस करायला तो इथे येऊन गेला होता. त्यावेळी नाही पण यावेळी तरी आईला इथेच बोलवावं असं त्या दोघांच्या मनात होतं नि ते खरंही झालं. ईशकृपेनं बहुतेक सारी अमेरिका पाहूनही झाली होती सहा महिन्याच्या 'स्टे' मध्ये. पण इथल्या महाराष्ट्र मंडळात माझे 'प्रवचनाचे' कार्यक्रम होतील असे वाटले नव्हते. मी आपल्या तिकडे महाराष्ट्रात 'भगवद गीतेवर प्रवचने करते. 'गीत गजानन, हा माझ्या सहकारी भगिनींसह कार्यक्रम करते. पण इथे करायला मिळेल असे वाटले नव्हते. कारण माझा मुलगा व सून इथे कायमचे राहणारे नसल्यामुळे त्यांनी कुठलेही महाराष्ट्र मंडळ जॉईन केलेले नाही. तसे ते 'इस्कान' चे मेंबर आहेत व त्याच्या कार्यक्रमांना शक्य असेल, जवळ असेल तर ते जातात व तेवढे त्यांना पुरेसे आहे. त्यामुळे माझा प्रवचनाचा कार्यक्रम इथे होणे अशक्यच वाटत होते.

पण कसा योग जुळून आला बघा. माझ्या मुलाच्या कंपनीत धीरज तिवारी हा गुजराथी मुलगा होता. त्याच्या मुलाचा वर्षाचा वाढदिवस तो 'कालामासू' इंडो अमेरिकन टेम्पल ॲन्ड कल्चरल सेंटर मधे करणार होता. माझ्या मुलाकडून त्याला मी इथे येतेय नि गीतेवर प्रवचन करते हे कळले होते. म्हणून त्याने विचारले आम्ही वाढदिवसाच्या दिवशी सकाळी मंदिरात पूजा पाठ नंतर भजन गायन करणार आहोत तर त्याप्रसंगी तुझी आई गीतेवर एक अर्धापाऊण तास बोलेल का? लहान मुले ही असतील समोर त्यांच्यावरही संस्कार होतील चांगले तर तशा दृष्टीने त्या बोलतील का? आणि दुसरे म्हणजे त्यांना हिंदीतून बोलावे लागेल. कारण येणारे लोक इंडियन आहेत पण फक्त मराठीच नसतील. आणि मी ते आव्हान स्वीकारले. कधी हिंदीतून गीतेवर बोलले नव्हते. पण माझे माहेर नागपूर चे असल्यामुळे मला हिंदी बोलण्याची सवय होती. मी तशी तयारी केली नि हिंदीतून मुलांना व प्रौढांनाही इंटरेस्टिंग वाटेल असे गोष्टीरुपाने गीतेचे महत्व व महात्म्य सांगितले. सर्वांना ते खूपच आवडले. अनेकजण त्याबद्दल माझ्याशी येऊन बोलून गेले.

एवढी संधी मिळाली, हेच खूप वाटले. नंतर तिथे आलेल्या एका बाईंच्या ओळखीच्या मराठी बाईंनी फोन करून आम्हांला त्यांच्या घरी गौरीच्या हळदीकुंकवाला बोलावले. त्यांच्याकडेही सर्व प्रांतातले लोक जमले होते. गणपती गौरी दोन्हीच्या दर्शनाला पुरुषमंडळीही होती. हिंदीत देवीच्या भजनांचा कार्यक्रम झाला. मग त्या बाईंनी मलाही एक भजन म्हणा सांगितले मी 'गीत गजानन' मधले भजन म्हटले. तिथे नंतर 'सुखकर्ता दुखहर्ता' वगैरे आरत्या झाल्या.

नंतर 'गोकुळाष्टमी' आली. अमोलचे एक 'इस्कॉन' डिव्होटी त्यांच्या फॅमिलीसह पुण्याहून इथून जवळ असलेल्या वॉरसा ड्योनास्टेट या भागात रहायला आले

होते. ते तसे दोनदा सगळेजण आमच्याकडे जेवायला येऊन गेले होते. त्याचे नाव श्रीनिवासन सिंगराज होते. त्यांची बायको ख्रिश्चन होती व ते साऊथ इंडियन. ते 'इस्कॉन' वाले असल्यामुळे अमोलची नि त्यांची पुण्यापासूनची ओळख होती. त्यांच्याकडे इथे अमेरिकेत पण दर शनिवारी सत्संग चालतो. त्या सर्वांनी गोकुळाष्टमी त्यांच्या घरी साजरी करायचे ठरविले. आम्ही डेट्रॉईट मधल्या 'इस्कॉन' मंदिरात पण गेलो. सकाळची जेवणे आटोपल्यावर त्यांच्याकडे दुपारी चारला सत्संगवाले लोक जमले प्रथम श्रीकृष्णाला पंचामृताचा अभिषेक झाला. असाच अभिषेक करायला आम्ही डेट्रॉईट मधल्या 'इस्कॉन' मंदिर होते, खूप डिव्होटीज अमेरिकन पण जमले होते. अभिषेक भजन सर्व झाल्यावर प्रसादाचे जेवण होते. ते करून आम्ही रात्री घरी आलो होतो. आज मला त्याचीच आठवण झाली.

सर्वांचा अभिषेक झाल्यावर त्यांनी पूजा केली. 'इस्कॉन' च्या बऱ्याच स्वामीजींचे फोटो पण मांडले. राधाकृष्णाची मूर्ती व इतरही सर्व फोटोंना हार घातले होते. देवांना अलंकारांनी सजवले होते. दिव्यांच्या माळा लावल्या होत्या. वातावरण पवित्र, प्रसन्न होते. त्यानंतर त्या शिंगराजू प्रभुजींनी श्रीकृष्णाच्या बाललीला इंग्रजीतून सांगितल्या. मग मला पण तुम्ही काहीतरी बोला म्हणून सांगितले. मी कृष्ण सुदाम्याची गोष्ट परत हिंदीतून सांगितली. व त्या गोष्टीवरचे माझ्या आईने लिहिलेले भक्तिगीत म्हटले 'जगावेगळा याचक आणिक जगावेगळा धनी। मूठभर पोह्यासाठी दिली का सुवर्ण नगरी कुणी! त्यानंतर त्याच्या सत्संगाला येणाऱ्या एका बाईंने लहान मुलांचे कृष्णलीलांवर तामिळ गाण्यावर बसवलेले डान्स मुलांनी वेशभूषेसह केले. कृष्ण व गोपिकांचे नृत्य सादर झाले. शेवटी अमोल नि सिंगराजू यांनी दोन तासापूर्वी तयार केलेला एक नाट्य प्रवेश हिंदीतून सादर केला. नुसत्या ज्ञानापेक्षा मनात श्रीकृष्णाबद्दल भक्ती भावना असणे जास्त महत्त्वाचे आहे हे एक विद्वान माणूस व नावाडी यांच्या संवादातून दाखवले. अचानक वादळ येऊन बोट बुडायची वेळ येते त्यावेळी त्या विद्वान माणसाच्या ज्ञानापेक्षा गावंढळ नावाड्याची भक्ती भावना नामसंकीर्तन त्यांना पैलतीराला पोचवते असे दाखवले होते. सगळाच कार्यक्रम छान रंगला. मग सगळ्यांनी प्रसादाचे भोजन व पंचामृत पान केले. अभिषेकाला आलेल्या प्रत्येकाने काहीना काहीतरी देवाला प्रसाद म्हणून आणले होते. शिवाय मिसेस सिंगराजू व मधुराने सर्वांसाठी पुरी भाजी व खीर बनवली होती. त्यामुळे खूपच प्रकार झाले होते. जेवणाचा कार्यक्रम झाल्यावर मग आम्ही रात्री आठला घरी यायला निघालो. अशा रीतीने अमेरिकेत 'गोकुळाष्टमी' छान साजरी झाली.

त्यानंतर नवरात्रीच्या पहिल्या दिवशी म्हणजे घटस्थापनेच्या दिवशी 'नोवी' या मिशिगन स्टेट मधल्या विभागात रहाणाऱ्या सोनाली साठे यांच्या घरी त्यांच्या सत्संग मंडळातर्फे माझा गीता प्रवचनाचा कार्यक्रम ठरला. या सोनालीची आई ठाण्यातली. माझ्या ओळखीची होती. मोहना जोशी त्यांचे नाव. त्या मुलीकडे बरेचदा येऊन गेल्या होत्या. मागे दोन वर्षापूर्वी त्यांनी माझी भगवद् गीतेवरची पंचवीस पुस्तके इकडे या सत्संग मंडळासाठी आणली होती. माझी संपूर्ण गीतेवर प्रवचने त्यांच्या भजनी मंडळात ठाण्याला झाली होती. त्यामुळे त्यांनी मला विचारले होते, अमेरिकेत कराल का प्रवचन! मी मुलीशी बोलून ठेवेन. तुम्ही मुलाकडे कधी जाल तर माझ्या मुलीशी संपर्क साधा. नि तो योग असा जुळून आला. तिच्या बंगल्याच्या बेसमेंट मधे तीसपस्तीस मराठी माणसे जमली होती. सगळी 'गीता प्रवचने' ऐकायला उत्सुक होती. काही साधारण पस्तीस चाळीशीच्या बायका ज्या मुद्दाम साडीत आल्या होत्या. नंतर मला येऊन म्हणाल्या आम्ही तुमच्या 'सांगे गीता' पुस्तकावरून गीतेचा अभ्यास करतो. आणि जेव्हा सोनाली म्हणाली, ह्या पुस्तकाच्या लेखिका इथे आल्यात, आपण

त्यांना बोलावायचं का माझ्या इथे गीतेवर प्रवचन करायला, तर आम्ही एकदम म्हणालो विचारतेस काय! बोलाव की त्यांना. आम्हांला अलभ्य लाभ होईल. नि खरचं तसंच झालं तुम्ही खूप छान सर्व सोप्या भाषेत समजून सांगितलंत आम्हाला. तुम्ही लांबून आलात म्हणून नाहीतर आज पंधरावा ऐकला तसे अठराही अध्याय ऐकायला आवडले असते आम्हांला तुमच्याकडून. आमच्या एकेकीकडे रहा ना दोन दोन दिवस तुम्ही. आम्हांला आवडेल. पण मला पुढे दोन कार्यक्रम लागले होते. नि आता जायचे दिवस जवळ आले होते. आधी आल्या आल्या हे जमले असते तर एकवेळ चालले असते. अमेरिकेत स्थायिक असलेल्या इतक्या लोकांना गीतेचे तत्त्वज्ञान जाणून घ्यायची इच्छा आहे हे पाहून बर वाटले.

त्यादिवशी नवरात्राचा पहिला दिवस 'घटस्थापना' म्हणून तिथे आलेल्या एका लिमये बाईंनी देवीचे स्तोत्र म्हणून कार्यक्रमाची सुरुवात केली, हे छान झाले. नंतर माझी आई मी प्रा. उषा लिमये रचित 'गीता गजानन' मधले एक गजानन महाराजांचे भक्तिगीत म्हणून गजाननाला मी वंदन केले. मग प्रवचन सुरू झाले. जवळपास तीन साडे तीन तास रंगले प्रवचन. त्यानंतर सर्वांना डीनर होते. प्रवचनाचे फोटो तर घेतलेच पण त्यांनी व्हिडीओ शुटिंग पण केले. ठाण्याला परत गेल्यावर तुझ्या आईला भेटेनच तू पण डिसेंबरमधे आईकडे येशील तेव्हा माझ्याकडे ये. इथेही अमोल मधुरा आहेत तोपर्यंत या कधीतरी त्यांच्याकडे सांगून आम्ही घरी निघालो. निघायच्या आधी त्या सत्संग सखींनी माझा आदर सत्कार करून भेटवस्तू दिली.

पुढच्या रविवारी ''ॲन आरबर मराठी मंडळात'' प्रवचन झाले. स्वाती कुलकर्णी व भूषण कुलकर्णी यांचे घरी. हे जोडपे गेली वीस एक वर्षे इथेच स्थायिक आहे व त्यांची इथे स्वतःचीच कंपनी आहे. दोघेही इथेच एम.एस. झालेले आहेत. आणखी गावकर, मालेकर, देशपांडे नलगीरकर वगैरे स्वतःच्याच कंपन्या असलेली किंवा इथल्या कंपनीत मोठ्या पदावर कार्यरत आसलेली इंजिनियर सर्व श्री व सौ. मंडळी प्रवचनाला उपस्थित होती. प्रवचन सर्वांना फारच आवडले आम्हांला अठराही अध्यायावर प्रवचन ऐकायला आवडले असते. पण आता तुमच्याकडे वेळही नाही नि तुम्ही खूप लांबून इथे आला आहात आज त्यामुळे ते शक्य नाही. पण खूप छान सोप्या भाषेत सांगता तुम्ही भगवत गीतेचं तत्वज्ञान. माधुरी देशपांडे तर म्हणाल्या आमच्या मुलांनाही समजलं असतं नि आवडलंही असतं ऐकायला फक्त त्यांना इंग्रजीतही ते स्पष्ट करून सांगायला लागलं असतं. प्रवचनानंतर मला ॲन आरबर मराठी मंडळातर्फे 'दीप' स्मृतीचिन्ह व मंडळातर्फे 'ग्रीटींग' पण देण्यात आले. एवढे मोठे पदाधिकारी असूनही लोक खूपच आतिथ्यशील होते. माझी व माझ्या आईची प्रा. उषा लिमये जवळपास वीस एक तरी पुस्तके त्यांनी त्यांच्या मराठी मंडळासाठी घेतली. त्यानंतर ग्रुप फोटोचा कार्यक्रम झाला. मग सर्वांना डिनर होते. त्यावेळी बऱ्याचजणांनी गीतेबद्दल त्यांच्या शंका व प्रश्न विचारले. संध्याकाळी सातला आम्ही परत निघालो. 'ॲनआरबर' पासून 'कालामाझू' दोन तासाचे अंतर. रात्री ९ ला घरी आलो.

अमेरिकेत आल्यासारखी अमेरिका तर पाहून झालीच सहा महिन्यात, पण भगवंताच्या कृपेने त्याच्याच गीतेवर प्रवचन रेकॉड करण्याची संधी पण चालून आली. हा 'दुग्ध शर्करा योग' 'मणीकांचन योग' सोन्याला सुगंधच, महत् भाग्यच.

**श्रीमती आशा भिडे**
बी/९ विजय अर्पाटमेंटस्,
आराधना टॉकीजजवळ,
ठाणे (प.) ४०० ६०२
दूरध्वनी - २५४१०१४०
मोबाईल - ९३२४०४४७६४

●●●

# तपस्येचे फळ

*तपश्चर्या या संदर्भातील एका कथेवर अंतर्मुख करणारा लेख- संपादक*

एक राजा होता. त्याच्याकडे खूप संपत्ती होती परंतु त्याला अपत्य नव्हते. आपल्याजवळ खूप साधनसंपत्ती आहे पण आपल्या वृद्धापकाळात आपणास आधार आणि संपत्तीचा वारस नाही म्हणून तो नेहमी चिंता करीत असे. त्यामुळे तो सदैव दु:खी असायचा. काही काळानंतर राजा वृद्ध झाला. राजकारभार चालवणे त्रासदायक वाटू लागले. त्याची पत्नी ही वृद्ध झाली होती. त्या दोघांनी शेजारच्या नगरीतील एका गरीब घराण्यातील मुलगा दत्तक घेण्याचे ठरवले. मुलगा दत्तक घेतल्यानंतर सर्व कारभार आणि संपत्ती त्या मुलाच्या हाती सोपवली. मुलाच्या हाती सर्व कारभार सोपवल्यानंतर तो मुलगा त्या वृद्ध राजाला विश्वासात न घेताच सर्व निर्णय घेऊ लागला. त्यामुळे वृद्ध राजाला वाईट वाटू लागले. आपली संपत्ती या मुलाच्या नावे आपण केली आणि तो आपणास विचारत सुद्धा नाही म्हणून तो दु:खी असायचा. सर्व संपत्ती आपलीच आहे म्हणून तो मुलाच्या कारभारात ढवळाढवळ करायचा. पण त्याची ढवळाढवळ त्या मुलास आवडायची नाही. त्या मुलाने अनेक वेळा समजावून त्याचा काही उपयोग होत नसे. राजाच्या पत्नीनेही खूप समजावले. आपले आता वय झाले आहे. तेव्हा मुलाच्या कारभारात लुडबुड न करता आपण लांब राहू. लांब राहूनच सर्व राजकारभार पाहू. मुलाला त्याच्या मर्जीप्रमाणे निर्णय घेऊ द्या. असे सांगूनही तो ऐकत नसे. त्यावेळी तो वृद्ध राजा म्हणायचा हा कुठला कुणाचा मुलगा याला आपण गादीवर बसवले, आपली सर्व धनदौलत याच्या नावे केली. याची योग्यताही नव्हती आणि हा आपल्याला विचारात न घेताच राजकारभार करतो आहे. शेवटी दोघांचेही पटेनासे झाले.

दत्तक घेतलेला मुलगा शिवलिंगाचा भक्त होता. तो रोज सकाळी बेलाची फूले वाहून शिवलिंगाची पूजा करीत असे. एक दिवस तो वृद्ध राजा आपल्या पत्नीसोबत नदी किनारी फेरफटका मारण्यासाठी गेला होता. परत येताना त्यांना नदीकाठी एक बेलाचे फूल दिसले. राजाला वाटले आपला मुलगा रोज शिवलिंगाची पूजा करतांना बेलाचे फूल वाहतो त्याच्यासाठी हे फूल घेऊन गेलो तर तो आपल्यावर खूष होईल, त्याचा राग नाहीसा होईल. म्हणून त्यांनी ते फूल तोडले आणि घरी गेल्यानंतर आपल्या मुलाच्या हाती देत म्हटले, ''बेटा हे फूल घे. तूला पूजेसाठी उपयोगी पडेल. '' त्यावेळी तो मुलगा म्हणाला, हे काय? एकच फूल कशाला आणलेत? आता माझ्या पत्नीसाठी दुसरे एक फूल घेऊन या. मग आम्ही दोघे जोडीने देवास फुले वाहू. हे शब्द ऐकताच त्या वृद्ध राजास खूप राग आला. हा आपणास आदेश देतो म्हणून आधिकच दु:खी झाला. शेवटी आपला मुलगा आता या नगरीचा राजा आहे त्याची आज्ञा आपण पाळलीच पाहिजे म्हणून तो तसाच आपल्या पत्नीसोबत दुसरे फूल आणण्यासाठी नदीकाठी निघून गेला. खूप खूप शोध घेतला पण त्यांना बेलाचे फूल काही केल्याने मिळेना शेवटी थकवा आल्यानंतर थोडी विश्रांती घ्यावी म्हणून ते दोघे एका झाडाखाली बसले. बराच अंधार पडत चालला होता. काहीही झाले तरी बेलाचे फूल घेऊन आपल्याला घरी गेलेच पाहिजे. म्हणून त्यांनी पुन्हा शोध घेण्यास सुरुवात केली. थोड्यावेळाने त्यांना जवळच एक घनदाट जंगल दिसले. त्याठिकाणी आपणास फुले मिळतील म्हणून ते दोघेही त्या जंगलाच्या दिशेने चालू लागले. जंगलाच्या जवळ जाताच त्यांना बेलाची अनेक फुले दिसू लागली. फूले पाहून त्या दोघांनाही खूप आनंद

झाला. फुले तोडण्यासाठी पुढे जात असतानाच प्रवेश द्वारातच दोन व्यक्ती तपस्या करीत असल्याचे दिसून आले. त्या राजाने त्या दोघांना एकच फूल तोडण्यासबंधी विनंती केली. त्यावर त्या तपस्वीने त्यांना एकच फूल तुम्हांला कशासाठी हवे आहे ते विचारले. त्यावेळी त्या वृद्ध राजाने त्यांना सांगितले की, मी या नगरचा राजा होतो. मला मूल नव्हते म्हणून मी शेजारच्या नगरीतील एका गरीब कूटुंबातील मूल दत्तक घेतले. त्या मुलाची योग्यता नसतानाही मी सर्व राजकारभार त्याच्या हाती सोपवला, त्याला गादीवर बसवले. आणि त्याच मुलाने मला आदेश देऊन हे फूल आणण्यासाठी सांगितले आहे. त्यावेळी त्या तपस्वीने त्या राजास सांगितले, तू कोण आहेस त्या मुलास राजा बनवणारा ? तू कोण आहेस सर्व संपत्ती त्याला देणारा? तू कोण त्याला राजगादीवर बसवणारा? त्या तपस्व्याने समोर बोट करून त्यास सांगितले की, हे जे माझ्या समोरचे रिकामे आसन आहे ना त्याच आसनावर माझ्याप्रमाणेच एक व्यक्ती गेली कित्येक वर्षे तप करीत बसली होती.त्यांनी केलेल्या तपस्येचे फळ म्हणूनच परमेश्वराने त्या मुलास एका गरीब घराण्यात जन्मास घातले आणि परमेश्वरानेच तुला ते मूल दत्तक घेण्यासाठी आदेश दिला आहे. एक गोष्ट लक्षात ठेव या जगात कोणीही कोणाला काही देत नसते. देतो तो केवळ परमपिता परमात्मा. आपण फक्त उपभोक्ते असतो. हे ऐकून त्या राजाचे डोळे पाणावले. आणि क्षमा मागत त्या तपस्वीना विनंती केली की, महाराज हे जे समोरचे रिकामे आसन आहे ना त्याच्या जवळ आजून एक आसन ठेवा. आता आम्ही दोघेही परत जाणार नाही. तुमच्या बरोबर अखंड तप करीत बसणार आहोत आणि ते दोघेही अखंड तपस्या करू लागले.

(प.प. शुधांशूमहाराज यांच्या प्रवचनावरून)

**श्री. यशवंत माने**
अबोली, बी - १०३, सुभाष रोड,
कुंभारखान पाडा, डोंबिवली (प.), जि. ठाणे
भ्रमणध्वनी - ९९३०१४८४४६

●●●

# अंबोली

सह्याद्री पर्वतरागांमध्ये पूर्वीच्या रत्नागिरी जिल्ह्यातील आणि आता सिंधुदुर्ग जिल्ह्यातील अंबोली हे दक्षिण कोकणातील चिमुकले हिलस्टेशन आहे. सावंतवाडी, बेळगाव किंवा गोव्याला जाताना ते हमरस्त्यावरच लागते. त्या घाटालाच मुळी 'अंबोली घाट' असे नाव आहे. सह्याद्रीच्या टोकाला वसलेले जांभूळ, हिरडा, बेहडा, आंबा, कारवी कोरफड, कढीलिंब, काळी तुळस अशी विविध प्रकारची झाडे येथे आहेत.

पुण्यापासून १२५ कि. मी. वर असलेल्या या स्थळी जाण्यासाठी शिवाजीनगरहून सकाळी ६ वाजता व ८ वाजता बसेस आहेत. संध्याकाळीही परत येण्यासाठी बसेस् उपलब्ध असतात. खेड-मंचर-घोडेगावमार्गे या बसेस् भीमाशंकरला जातात.

## गवताळ अभयारण्य

औरंगाबाद जिल्ह्यातील कन्नड या गावापासून ३३ कि. मी वर असलेला गवताळ परिसर म्हणजे पानझडी वृक्षांचे जंगल आहे. खैर, बांबू, बाभूळ अशी कमी पाऊस लागणारी झाडे येथे आढळतात. तसेच वाघ, बिबट्या, चितळ, अस्वल हे प्राणी व वेगवेगळे पक्षी आढळतात. या भागात अलीकडे १८ लाख वृक्षांची लागवड झाली आहे. ४०० हेक्टर्स्च्या या प्रदेशाच्या विकासाचे प्रयत्न चालू आहेत अशा प्रकारच्या अनेक अभयारण्यांनी महाराष्ट्राला आणि गोमंतकाच्या सीमेवर असलेले हे निसर्गरम्य गाव मुख्य रस्त्यावर असल्यामुळे तिथे पर्यटकांची गर्दी असते. कोल्हापूर, बेळगाव आणि गोवा येथून पर्यटक तेथे येतात. हिरवीगार झाडी, लालभडक रस्ते, पाऊलवाटा, टेकडीच्या उतारावर हॉलिडे कॅम्प, दाट झाडीत दडलेला डाक बंगला आणि गच्च हिरवे रान

पान क्र. २९ वर

# होहोटः चीनमधील ऐतिहासिक आणि सांस्कृतिक शहर

*चीनमधील होहोटचे हे प्रवासवर्णन. डॉ. आगरकरांचे लेख अतिशय आवडतात अशी प्रतिक्रिया देणाऱ्या वाचकांसाठी – संपादक*

**प्रस्तावना**

किशोरवयीन मुलांच्या नवनिर्मितीला वाव देण्यासाठी चीनची विज्ञान संघटना दरवर्षी एक स्पर्धा आयाजित करते. जुलै आणि ऑगस्ट हे चीनमधील सुट्ट्यांचे महिने. या काळातच ही स्पर्धा आयोजित करण्यात येते. या स्पर्धेचे यजमानपद देशातील एका राज्याकडे जाते. आधीच्या वर्षी स्पर्धेचा शेवट करतानाच पुढील स्पर्धेचे ठिकाण जाहीर केले जाते. त्या नियमानुसार ऑगस्ट २०१० मध्ये गोंजाऊ येथे २५ व्या स्पर्धेच्या निरोप समारंभात २६ व्या स्पर्धेचे ठिकाण सांगण्यात आले. देशाच्या उत्तर भागात हे शहर आहे एवढेच तेव्हा आम्हांला कळले. प्रत्यक्ष स्पर्धेच्या ठिकाणाची नक्की माहिती चीनमधून निमंत्रण आले तेव्हाच समजली. निमंत्रण पत्रात सांगितले होते की २६ वी स्पर्धा होहोट या शहरात ऑगस्ट ३ ते ७, २०११ या कालावधीत आयोजित करण्यात येत आहे. त्यानंतर आम्ही या शहराची माहिती काढण्याचा प्रयत्न केला.

होहोट हे आंतर मंगोलिया (Inner Mongolia) या राज्याच्या राजधानीचे शहर आहे. मंगोलिया देशाला लागून असलेले हे राज्य. या राज्याला स्वायत्तता आहे. चीनमधील काही राज्यांना अशी स्वयत्तता देण्यात आलेली आहे. हाँगकाँग हे त्यातले एक राज्य, तसेच चीनच्या दक्षिण पश्चिमेला असलेले शिनजँग राज्य हे त्यातील दुसरे. त्याच धर्तीवर आंतर मंगोलिया राज्याला स्वायत्तता देण्यात आलेली आहे. राज्यासंबंधीचे सर्व निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करण्याचे अधिकार राज्यातील राजकारण्यांना आहेत. अशा या आगळ्यावेगळ्या राज्याची होहोट ही राजधानी. विमानतळावर उतरल्यापासून या शहराबद्दल मोठेच कुतूहल मनात होते. ते तर शमलेच, त्याचबरोबर शहराबद्दल अनेक महत्वाच्या गोष्टी आम्हांला कळल्या. त्या या लेखात देण्याचा प्रयत्न केलेला आहे.




**होहोट हे शहर देशाच्या उत्तर पूर्वेला आहे**

**ऐतिहासिक शहर**

होहोट हे एक ऐतिहासिक शहर आहे. मंगोलियन राजा अल्तान खानने १५८० मध्ये या शहराची स्थापना केली. चेंगिझ खान हा शूर योद्धा याच परिसरातला येथल्या लोकांचा गट तयार करून आणि युद्ध साहित्य निर्माण करून त्याने आशिया खंडातील अनेक प्रदेशांवर स्वाऱ्या केल्या. त्याच्या वंशजांनी या शहराचा विकास केला. चेंगिझ खानचे या परिसरातले स्थान लक्षात घेऊन त्याचा भव्य पुतळा शहरात उभारलेला आहे. घोड्यावर स्वार झालेला हा पुतळा पाहून शिवाजी महाराज किंवा राणा प्रतापाची

आठवण झाल्यावाचून राहात नाही. चेंगिझ खाननंतर आलेल्या राजांनी शहरात अनेक मंदिरे बांधली. चीनच्या इतर भागाप्रमाणेच या भागातदेखील बौद्ध भिक्षुकांनी बौद्ध धर्माचा प्रसार केला. त्यांच्या राहण्या आणि खाण्यापिण्याची सोय व्हावी यासाठी शहरात वसतीगृह (Monasteries) बांधलेले आहेत. बुद्धांच्या प्रचंड मूर्ती असलेली मंदिरे शहरात ठिकठिकाणी बांधलेल्या आहेत. पाच पगोडे एकत्र असलेली इमारत शहरात आहे. या सगळ्या ठिकाणांना भेट देण्याचा योग आला. या भेटीवर आधारित स्वतंत्र लेख लिहिण्याचा मानस आहे.



**चेंगीझखानचा पुतळा**

### मिश्र संस्कृती

मंगोलियाचा भाग असल्याने मंगोल लोक हे येथील मूळचे रहिवाशी. ते मंगोलियन भाषा बोलतात. परंतु असे लोक संख्येने खूप कमी आहेत. केंद्रातील विचारवंतांनी ठरवून या शहरात हान चिन लोक वसतीसाठी पाठविले. आज त्यांची संख्या ८५ % हून जास्त आहे. मंडारिन चायनिज ही त्यांची भाषा. त्यांच्याबरोबर मंगोल लोकदेखील चिनी भाषा बोलतात व लिहितात. चिनी आणि मंगोलियन भाषेत खूप फरक आहे. त्यांची लिपीदेखील वेगळी आहे. चिनी भाषा डावीकडून उजवीकडे लिहितात तर मंगोलियन भाषा वरून खाली लिहितात.

शहरातील मिश्र संस्कृतीची झलक शहरातून फेरफटका मारताना लगेच जाणवते. शहरातील एका रस्त्याच्या दुतर्फा इस्लाम संस्कृतीचा प्रभाव असलेल्या इमारती आहेत. दुसऱ्या भागात बौद्ध संस्कृतीचा प्रभाव असलेली घरे आहेत. इतर भागांत पाश्चिमात्य प्रभाव असलेल्या इमारती आहेत. स्थानिक लोक अनेक रंगीबेरंगी कपडे वापरतात. त्यांच्या जेवणाखाण्यात खूप विविधता आढळते. त्यावर मंगोलिया आणि चीन या दोन्ही देशांचा प्रभाव जाणवतो.



**नव्याने बांधलेल्या इमारती**

### प्रगतीच्या पाऊलवाटा

चीनने १९८० मध्ये आर्थिक विकासाचा मार्ग स्वीकारला. त्यानुसार देशातील एकेका भागाचा विकास करायला त्यांनी सुरुवात केली. विकासकार्याच्या त्यांच्या यादीत होहोट शहराचा क्रम बऱ्याच उशीरा लागला. इसवी सन २००० मध्ये येथील विकासाला सुरुवात झाली. मागील दशकात डोळ्यांत भरण्याएवढी प्रगती या शहराने केलेली आहे. शहरात रुंद रस्ते, सुंदर विजेचे खांब, रस्त्याच्या दुतर्फा झाडी सर्वत्र पाहायला मिळतात. विकासाचे कार्य अजून पूर्ण झालेले नाही. शहराच्या काही भागांत विकासाची कामे सुरू असल्याचे दिसते. नवनवीन इमारती, नवनवीन बागा बांधण्याची कामे चालू आहेत. शहरातून एक कृत्रिम कालवा काढण्याचे काम चालू आहे.

या कालव्याचा खालचा पृष्ठभाग तसेच कालव्याच्या कडा सिमेंटने बांधून काढलेल्या आहेत. कालव्याच्या दोन्ही बाजूला पाऊलवाट बांधण्याचे काम चालू आहे. कालवा, त्यासभोवतीची झाडी आणि पाऊलवाट पूर्ण झाली की ते एक पर्यटनस्थळ होईल यात शंका नाही.



**अर्धवट स्थितीतील कालवा**

सुविधा पुरवून चीनने जागतिक उद्योगधंद्याना आपल्याकडे आकर्षित केलेले आहे. यांतील बरेचसे उद्योग शांघाय, बेंजिंग, जिनान, गोंजाऊ अशा शहरांजवळ आहेत. होहोटमध्ये फारसे उद्योगधंदे नाहीत. पण त्यांना आकर्षित करण्याचे प्रयत्न चालू आहेत. विशेष म्हणजे उद्योग परिसराच्या विकासाबरोबरच शहराचा विकास करण्याचे काम चालू आहे. जुन्या इमारती पाडून तेथे गगनचुंबी इमारती बांधल्या जात असल्याचे दृश्य अनेक ठिकाणी आपल्याला पाहायला मिळतात.

**पर्यटकांचे आकर्षणस्थळ**

होहोट हे पर्यटनासाठी अतिशय योग्य असे शहर आहे. शहरातील देवळे, पगोडे याखेरीज शहरात एक अतिभव्य असे वस्तुसंग्रहालय आहे. येथे प्राचीन तसेच अर्वाचीन अशा अनेक वस्तू पद्धतशीर लावून ठेवलेल्या आहेत. शहरात एक भव्य असे जिम्नॅशियम (Gymnasium) आहे. खरे आकर्षण तर शहराच्या बाहेर आहे. एका बाजूला डोंगर तर दुसऱ्या बाजूला गवताळ प्रदेश अशी तेथली भौगोलिक परिस्थिती आहे. गवताळ प्रदेशात जाऊन येणे ही पर्यटकांना एक पर्वणीच असते.



**जिम्नॅशिअमची इमारत**



**शहरातील सुंदर रस्ते**

पर्यटकांना आकर्षित करण्याच्या सर्व बाबी येथे पाहायला मिळतात. एकतर जाण्यायेण्याच्या सोयी. होहोट या शहरात रस्ता, रेल्वे तसेच विमानाने येता येते. आलेल्या पर्यटकांना परवडेल अशा किमतीत राहण्याच्या आणि खाण्याच्या सोयी व्हाव्यात यासाठी सगळ्या प्रकारची हॉटेल्स येथे बांधलेली आहेत. पर्यटकांना फिरायला सोयीचे व्हावे यासाठी टॅक्सी व बसची पुरेशी सुविधा निर्माण करण्यात आलेली आहे. एकदातरी या शहराला नक्कीच भेट द्यावी. परंतु हिवाळ्याचे दिवस टाळावेत. या शहराचे अक्षांश आणि

रेखांश अनुक्रमे ४०°.४९' उत्तर आणि १११°.३९' पूर्व असे आहेत. विषुववृत्तापासून दूर असल्याने येथे हिवाळ्यातले तपमान शून्याच्या खाली २० से. एवढे असते. आपल्याकडील उन्हाचा त्रास कमी करावयाचा असेल तर उन्हाळ्यात होहोटला जाऊन यायला हरकत नाही. येथे पाऊस खूप कमी पडतो. साधारणपणे पावसाचे वार्षिक मोजमाप ४०० मी.मी. म्हणजे १५.७ इंच एवढेच असते. हा पाऊस जुलै व ऑगस्ट या कालावधीतच येतो. इतर वेळेस निरभ्र आकाश दृष्टीस पडते.

**डॉ. सुधाकर आगरकर**
सी-१४, विसावा वैभव नगरी,
कल्याण शीळ रोड,
काटई, ता. कल्याण
जि. ठाणे - ४२१२०४

•••

•

**जागतिक हृदय स्वास्थ्य संघटनेतर्फे ३० सप्टेंबर हा दिवस जगभरातील शंभराहून आधिक देशांमध्ये 'जागतिक हृदय दिन' म्हणून दरवर्षी साजरा केला जातो. 'टिम अप फॉर हेल्दी हार्ट' हे यावर्षी या दिवसाचे बोधवाक्य निश्चित करण्यात आले आहे. म्हणूनच हृदयस्वास्थ्यासाठी योगोपचारांच्या माध्यमातून केल्या जाणाऱ्या प्रयत्नांची माहिती करून घ्यायला हवी**

**- संग्रहातून**

रागात व्यक्ती फायद्याचा - तोट्याचा मान-अपमानाचा कसलाही विचार करीत नाही. त्याचे अनेक दुष्परिणाम होतात. आणि त्यातील बरेचसे परिणाम राग करणाऱ्यालाच सोसावे लागतात. म्हणून ज्यावेळी आपल्याला राग येईल, त्यावेळी स्वत:ला सावरायला हवे. प्रथमत: राग आल्यानंतर थंड पाणी प्यावे. नंतर आपल्या आवडीचे एखादे काम हाती घ्यावे किंवा आपल्याला आवडत असलेले गाणे किंवा संगीत ऐकावे. घर नीटनीटके करणे या गोष्टी राग कमी करण्यास मदत करतात. हे उपाय रागावर त्वरित नियंत्रण ठेवण्यास फायदेशीर आहेत. जर आपल्याला रागाला कायमचे हद्दपार करायचे असेल, तर खालील उपाय करून पाहा.

नेहमी आशावादी राहा, स्वत:वर संयम ठेवा, धैर्य राखा, हसत रहा.

इतरांच्या क्षुल्लक चुकांकडे, दुर्लक्ष करा. आपल्यावरील टीका हसतमुखाने स्वीकारा. जगात प्रत्येक गोष्ट आपल्या मनासारखी होणे शक्य नसते आणि प्रत्येक व्यक्ती आपल्या मनाप्रमाणेच वागेल हेही शक्य नसते हे समजून घ्या.

छोट्या -छोट्या प्रसंगातून आनंद मिळविण्याचा प्रयत्न करा. आनंदी व्यक्तीच्या सहवासात राहा.

व्यायाम, सकाळचे फिरणे, संतुलित आहार व सामंजस्यपूर्ण व्यवहार करा. फक्त चेहऱ्यावरच नको तर मनापासून आनंदी राहण्याचा प्रयत्न करा.

- संग्रहातून

# भारतीय संस्कृतीचा मूळ पाया

(लेखांक पांचवा)

*भारतीय संस्कृती संदर्भातील लेख मालेतील पुढील लेख – संपादक*

**तात्विक ग्रंथ :**

सहाव्या ते तेराव्या शतकातील कालखंडात एक प्रवृत्ती अति समर्थ झाली होती. त्या प्रवृत्तीने बुद्ध जैन, षट्दर्शने आदि ग्रंथ निर्माण केले. ही प्रवृत्ती आध्यात्मिक अनुभावाने स्फुरित होऊन सत्ये तात्विक बुद्धीने तर्कबुद्धीला समजावून देण्याचे कार्य करी. या कालखंडातील तत्त्वज्ञानात्मक लिखाण या गोष्टीची साक्ष आहे. शंकराचार्य, रामानुजाचार्य, मध्य, दक्षिणे कडील तत्त्वज्ञानात्मक लिखाणातही प्रवृत्ती स्पष्टपणे मोठ्या प्रमाणात आढळते. या अखंड प्रवृत्तीमुळे तात्विक बुद्धीचा प्रसार सामान्य जनांपर्यंत पोचला. पुराणोक्त धर्म प्राचीन आध्यात्मिकतेचे, तत्त्वज्ञानाचे धार्मिक संस्कृतीचे व त्यातील सत्याचे नवे आकार व विस्तार आहेत. संस्कृत साहित्याचा आरंभ वेद उपनिषदे यांच्यापासून झाला. उत्तर कालीन साहित्याचा प्रारंभ संत व भक्त यांच्या स्फूर्तिमूलक काव्यापासून झाला. भारतीय संस्कृतीचा विकास व तत्त्वज्ञानात्मक लिखाणात पुराणे व तन्त्र ग्रंथांतील धार्मिक काव्याने तो स्पष्ट दिसतो. टिकाऊ प्रवृत्ती ठरली. लोकमतावर या प्रवृत्तीचा टिकाऊ परिणाम झाला.

**भारतीय राजकारण:**

मनुष्याचे मानसिक, आध्यात्मिक, धार्मिक बौद्धिक नैतिक सौंदर्य प्रिय जीव या नात्याने होणारे सर्व व्यवहार यातून भारताच्या भव्यतम शक्ती उदयास आणतात. जी भारतीय संस्कृती सर्वश्रेष्ठ आहे. त्या संस्कृतीचा आत्मा काय आहे, आंतरिक प्रयोजन काय? वास्तवात काय कमाई केली? हे नीट समजून घेण्यासाठी हे निरीक्षण करावयाचे असते.

आधुनिक मानव अपूर्व प्रमाणात राजकीय, आर्थिक, सामाजिक मानव झाला आहे. तो बाह्य अस्तित्वाच्या कार्यक्षेत्रतेला सर्वांत आधिक महत्त्व देतो. तो मानसिक आत्मिक गोष्टींना मानवतेच्या जीवन विषयक व यांत्रिक प्रगतीला त्या साहायक होतात. एवढ्या करताच केवळ महत्त्व देतो. त्याला प्राचीनांची दृष्टी नाही. सर्वाधिक महत्त्वाच्या मानवी संस्कृती व प्रगतीसाठी पूर्वज उच्च ठिकाणी दृष्टि लावून होते. आधुनिक मानवाची प्रवृत्ती अतिरेकी व किळसवाणी आहे. आध्यात्मिक विकासाला मारक आहे. संस्कृती तेव्हाच पूर्ण समर्थ मानली जाते जेव्हा ती बाह्य अस्तित्वाला आकार देऊन त्याला श्रेष्ठ उच्च आदर्शाच्या दिशेने प्रगतिकरण्याचा मार्ग बनविते. हा समर्थ प्रगतीपर संस्कृतीचा अर्थ आहे.

राजकीय, आर्थिक, सामाजिक जीवन समर्थ व शक्तिमान असावयास हवे. जेणे करून जनतेला संकटात देखील टिकून आपला विकास व सुखरूप वाटचाल करता येईल. भारतीय समाजाच्या आत्म्यावर व शरीरावर जी ध्येये व आदर्शाचे शासन होते ते उच्चतम होते. भारतीय समाज व्यवस्थेचा पाया अढळ व स्थिर होता. जीवन शक्ती जोरदार होती. एकतेच्या पोटी विविधता होती. सौंदर्य होते. उत्पादन क्षमता होती. गतिमानता होती. या अवनतीच्या दिवसात ही पूर्वीच्या वैभवाची अंधुकशी छाप थोडी बहुत टिकून आहे.

**प्राचीन कालीन राजा :**

राजा पेक्षा मोठी सार्वभौम सच्चा भारतात धर्माला होती. धर्म म्हणजे लोक जीवनाचे मूलभूत शासन करणारा नैतिक, सामाजिक, राजकीय, न्यायासनीय व रूढीचा कायदा अशी सत्ता पवित्र मानली जात असे. तिचे अंतरंग शाश्वत मानले जात असे. तिचे बाह्य अंग एकंदरीने नेहमी तेच राहात असे. प्रादेशिक, कौटुंबिक व इतर रूढी ह्या मूळ कायद्याला (धर्माला) सहकारी दुय्यम सहकारी म्हणून उपयोगाला येत. ब्राह्मण हे या धर्माचे नोंद करणारे व प्रवक्ते होते. ते काही धर्माचे निर्माते नव्हते. ब्राह्मणांना धर्मात बदल करण्याचा अधिकार नसे. राजा या धर्माचा संरक्षक, सेवक व अंमल बजावणी करणारा होता. हा धर्म नीट पाळला जातो की नाही हे त्याने पाहावयाचे. अपराध होऊ नयेत, मोठ्या चुका मोठे नियम भंग होऊ नयेत अशी खबरदारी त्याने घ्यावयाची असे. हा धर्म पाळण्यास तो स्वत: बांधलेला असे. राज्यपदाची सत्ता कोणत्या क्षेत्रात चालवयाची त्या त्या क्षेत्रांत कर्तव्ये कोणती, अधिकार कोणते या विषयी धर्माचे नियम कडक असत आणि हे नियम राजाला पाळावे लागत.

राजसत्तेने धर्माचे अंकित राहावे ही केवळ तात्विक उपपत्ती नव्हती तर व्यवहार तिला धरून होत होता. सामाजिक धार्मिक कायद्याचे शासन लोकांच्या सर्व जीवनाला व्यापून होते. ते जिवंत सत्य होते. राजकीय क्षेत्रात या सत्याचे व्यावहारिक परिणाम फार मोठे झाले.

राजाला कायदा करण्याची सत्ता नव्हती. तो कारभार विषयक हुकुम काढू शके हे हुकूम समाजाच्या धार्मिक, सामाजिक, राजकीय व आर्थिक याना धरून असावे लागत. इथे दुसऱ्या काही सत्ता होत्या. त्या कार्यरत सत्ताना पण कारभारविषयक हुकूम काढण्याचा अधिकार होता. राजाचा राज्यकारभार, त्याचे सामान्य स्वरूप, त्याचे परिणाम व्यक्त किंवा अव्यक्त लोकमताला धुडकावणारे नाहीत ना हे राजाला पाहावे लागे.

सामान्य लोकांच्या धार्मिक स्वातंत्र्याची बूज राखली जात असे. कोणतीही ऐहिक सत्ता या स्वातंत्र्यावर प्रहार करीत नसे. प्रत्येक धार्मिक समाज, प्रत्येक नवा किंवा जुना धर्म आपले जीवन स्वरूप ठरविण्यास आपल्या संस्था साकार करण्यास मोकळा असे. प्रत्येकाला त्याचा शासक वर्ग असे. हा शासक वर्ग पूर्ण स्वतंत्र असे. राजाला म्हणून स्वतंत्र धर्म नसे. आणि राजा हा लोकांचा धर्मप्रमुख नसे. या बाबतीत सम्राट अशोकाने आपल्या राजसत्तेचा विस्तार केला. आपल्या नियंत्रणाचे व प्रभावाचे क्षेत्र वाढविले. मात्र ते शिफारशीच्या स्वरूपाचे होते. आज्ञाचे स्वरूपाचे नव्हते. समाज स्वातंत्र्य हे भारतीय तत्त्व होते. याला धरून राजाला धार्मिक श्रद्धांच्या व संस्थांच्या बाबतीत बदल हवा असला तर धार्मिक लोकमान्य अधिकारी, व्यक्तीची वा संस्थांची संमती घ्यावी लागे. किंवा तशी सूचना सभेपुढे विचारार्थ मांडावी लागे. राजा या नात्याने त्याला लोकांमधील सर्व धर्माना सारखीच नि:पक्षपाती वागणूक द्यावी लागे. भारतीय राजकारणात धार्मिक असहिष्णुतेला व जुलुमला स्थानच नव्हते.

भारतीय लोकांच्या सामाजिक जीवनात राजसत्तेचा हस्तक्षेप होत नसे. राजाने सामाजिक कयादे केल्याची उदाहरणे क्विचितच सापडतात. राजाला यासाठी संबंधित लोकांची इच्छा काय आहे हे पहावे लागे. समाजात बदल हा समाजच अंत:स्फूर्तीने घडवून आणित असे. कुटुंबाना व विशिष्ट जमातीना त्यांचा आचार विचार ठरविण्याचे व बदल करण्याचे स्वातंत्र होते. त्या स्वातंत्र्याचा उपयोग करून कुटुंबे, जमाती, आपले विचार ठरवीत असत व प्रसंगी बदलीत असत.

कारभाराच्या क्षेत्रातही धर्माच्या स्थायी घटनेने राजाची सत्ता मर्यादित केलेली होती त्याचा कर बसविण्याचा अधिकार उत्पन्नाच्या महत्वाच्या क्षेत्रात मर्यादित होता.

अमुक टक्केकर बसवावा अशी मर्यादा त्याच्या अधिकाराला होती. एक सामान्य नियम असा होता. राजाला राज्य करण्याचा अधिकार तो पर्यंत असे, जोवर तो लोकांचे समाधान करू शकत असे व जोवर लोक त्याच्या विषयी सद्भाव बाळगून असत. हा सामान्य नियम राजाचा कर बसविण्याचा अधिकार मर्यादित करी. कराच्या मर्यादेच्या व्यवस्था धर्माच्या रक्षणदाराच्या ब्राह्मणांच्या केवळ सदिच्छा होत्या. या व्यवस्था व्यवहारात होत्या. राजा सर्वश्रेष्ठ न्यायासन होता. दिवाणी फौजदारी कायद्याची अनेक बजावणी करणारा सर्व श्रेष्ठ नियंत्रक होता. मात्र त्याचे काम अंमल बजावणीचे होते. जसा कायदा असेल तसा तो आपल्या न्यायाधीशाच्या द्वारे किंवा तज्ज्ञ ब्राह्मण न्यायाधीशाच्या साहायाने प्रामाणिकपणे कार्यवाहीत आणणे एवढेच त्याचे काम होते.

राजा परराष्ट्र धोरण, लष्करी कारभार,युद्ध व तह आणि इतर पुष्कळ देखरेखीची मार्गदर्शनाची कार्ये, आपल्या सल्लागार मंडळाच्या साहाय्याने करण्यास मोकळा असे. या बाबतीत कसलेही नियंत्रण नसे. समाजाचे कल्याण, सामाजिक सुव्यवस्था, सार्वजनिक नीती आणि इतर गोष्टी या वरील देखरेख व नियंत्रण राजसत्तेने करणे. उत्तम कारभार राजाने कार्यक्षम रीतीने करावा अशी त्याला पूर्ण मोकळीक होती. कायद्याशी सुसंगत होईल अशा प्रकारे दंड करण्याचा वा पुरस्कार करण्याचा अधिकार राजाला होता. हा अधिकार जनतेच्या कल्याणाकडे पूर्ण लक्ष ठेवून वापरावा अशी अपेक्षा असे.

प्राचीन भारतीय राज्य व्यवस्थेत सामान्यत : राजाच्या लहरीला, अत्याचाराला, जुलुमाला जागाच नव्हती. मनूचा आदेश आहे की अन्याय करणाऱ्या, जुलूम करणाऱ्या राजाला त्याच्या प्रजाजनांनी त्याला पिसाळलेल्या कुत्र्याप्रमाणे ठार करावे. राजाचा अनियंत्रित राज्य करण्याचा अधिकार मानला जात नव्हता. प्रजा अशा राजाला दूर करी अथवा ठार करी कर्तव्यच्युत राजाला मार्गावर आणण्यासाठी एक शांततेचा उपाय योजण्यात येत असे. हा उपाय म्हणजे तुझ्या राज्यात आम्ही राहणार नाही, आम्ही तुझे राज्य सोडून जाऊ अशी राजाला धमकी देणे. या धमकीने राजाला लोकद्रोही ठरविले जाई व त्याला पदच्युत केले जात असे. अशी ही राजसत्ता सौख्य, कार्यक्षम व कल्याणकारक ठरली. ही राजसत्ता अनेक संस्थापैकी एक संस्था होती. ही गोष्ट प्राचीन लोकसत्ताचे अस्तित्व स्पष्ट करते.

**रूपकात्मक वर्णन :**

भारतीय राज्य कारभार एक स्वतंत्र वस्तू आहे. ही भारतीय मनाच्या जीवनाच्या अविष्कारावर अवलंबून नसलेली स्वतंत्र यंत्रणा आहे. या दृष्टीने त्याकडे पहिल्यास त्याचे खरे स्वरुप समजू शकत नाही. भारताच्या आध्यात्मिक मनाने जीवन हे विश्वात्म्याची अभिव्यक्ती आहे असे ठरविले होते. समाज हा ब्रह्माचे सृष्टिकर्त्याचे शरीर आहे. जनता ही समष्टीरूप ब्रह्माचा प्राणकोश आहे. तसेच तो सामूहिक नारायण आहे. व्यक्ति रूप ब्रह्म म्हणजे व्यक्ती जीव व्यक्तिभूत नारायण. राजा हा ईश्वराचा जिवंत प्रतिनिधी आणि समाजाचे दुसरे विभाग विश्वात्म्याच्या प्राकृतिकशक्ती आहेत. अशी भारतीय मनाची विचार सरणी होती. म्हणून भारतीय राजकीय सामाजिक संघटनेचे सर्व संमत संकेत तिच्या संस्था, तिच्या रूढी, तिची घरणा, या गोष्टी केवळ जनतेवर बंधनकारकच नव्हता तर त्यांना एक प्रकारचे पवित्र्य पण होते.

प्राचीन भारतात अशी कल्पना होती की मानवी जीवनाची योग्य व्यवस्था विश्वाच्या व्यवस्थेप्रमाणे नीट टिकून राहावयाची जर प्रत्येक व्यक्तीने स्वधर्म प्रामाणिक पणे पाळावयास हवा आणि समष्टीने पण असेच वागावयास हवे. कुटुंब, कुळ, जाती, वर्ग, सामाजिक, धार्मिक, औद्योगिक, समूह राष्ट्र जनता हे सर्व समष्टी जीव, सामूहिक

जीव आहेत. ते जीव आपआपला धर्म विकास पद्धतीने तयार करतात.

**चार अवस्था :**

भारतीय सभ्यतेच्या सामाजिक, राजकीय, विकास चार अवस्थांतून गेला आहे. पहिली अवस्था-आर्यांची साधी जमात, दुसरी अवस्था-ही दीर्घकाळ टिकलेली संक्रमण अवस्था. या अवस्थेत आर्य आपल्या राष्ट्रीय जीवनात राजकीय रचनेचे व राजकीय समन्नयाचे अनेक प्रयोग करीत होते. तिसरी अवस्था - या अवस्थेत राजसत्ताक राज्य तयार झाले. जनतेच्या सामूहिक जीवनाच्या संकीर्ण घटकाचे प्रदेशांतर्गत साम्राज्यांतर्गत संघ स्थापून एकीकरण केले गेले. चौथी अवस्था ही अवनतीच्या युगातील अवस्था. या अवस्थेत जनतेचा विकास थांबून अवनतीकरण चालले. इतर जीवन पद्धती भारतावर लादल्या जाऊ लागल्या. पहिल्या तीन अवस्था स्थिर स्वरूपाच्या होत्या. त्या काळात लोकजीवनाचा विकास जोरदार पण संथ होत होता.

प्राचीन भारतात मीन शासक संस्था होत्या. मंत्रियुक्त राज्य, राजधानी सभा, व राज्याची लोकसभा, मंत्रियुक्त मंडळातील मंत्री सर्व वर्णांतून घेतले जात. या मंडळात ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, व शूद्र यांचे प्रतिनिधी निश्चित असत. वैश्यांची संख्या इतरांहून आधिक असे. अर्थ विषयक धोरण जनतेच्या हित संबंधीचे महत्वाचे व्यवहार कारभारी मंडळाच्या अनुमती वाचून चालत नसे. राजा हा शक्ती स्थानाचा प्रतिनिधी म्हणून राजपद भोगीत असे. एकशाहीहून ही व्यवस्था वेगळी होती.

**ग्राम नगर शसन संस्था :**

भारतीय राज्य कारभारात ग्राम व नगर या संस्था पायाभूत होत्या. व या संस्था अतिशय स्थिर होत्या. या केवळ प्रादेशिक घटक नव्हत्या, किंवा सोयीचा अशा निवडणूक कारभार किंवा दुसरे सामाजिक राजकीय हेतू पुरवणाऱ्या साधनभूत संस्था नव्हत्या, त्या खऱ्या खुऱ्या जमात संस्था होत्या. त्यांना त्याचे अधिकारयुक्त कार्य होते. त्या केवळ राज्ययंत्राचा भाग म्हणून काम करीत नव्हत्या. तर त्यांना त्यांचे स्वाभाविक जीवन होते. ग्राम संस्था ही एक लहानसे ग्रामलोक सत्ताक होते. प्रत्येक ग्राम त्याच्या मर्यादेत स्वायत्त होते. स्वयंपूर्ण होते. त्याचे शासन त्याच्या निवडलेल्या पंचायतीकडे असे. प्रत्येक गाव आपल्या गरजा भागवत असे. आपल्या शिक्षणाची आरक्षक संघाची, न्याय मंडळाची व्यवस्था करीत असे. आपल्या आर्थिक गरजा व व्यवहार यांची व्यवस्था लावीत असे. एकदंरीत, ही गावे स्वतंत्र स्वायत्त घटक या नात्याने आपले सर्व जीवन चालवीत असत.

अनेक ग्राम एकत्र येऊन ग्राम संघही असे. ग्रामा प्रमाणेच हे ग्राम संघही स्वायत्त, स्वयं शासित असत. त्यांचा शासकीय कारभार, त्यांच्या सभा, समिती करीत आणि ग्रामे प्रतिनिधी पाठवीत. भारतीय राज्य कारभारात राजा हा व्यक्तिश: भारताच्या स्थिर सभ्यतेचा व स्वतंत्र जिवंत जनतेच्या शक्तिमग्न सामान्य प्रमुख होता. आणि त्याची कार्यपद्धती लहरी, एकशाही अथवा नोकरशाही स्वरूपाची नव्हती. हे भारताच्या थोर स्थिर सभ्यतेचे आणि स्वतंत्र जिवंत जनतेचे प्रगतीचे प्रमुख अंग होते.

भारतीय संस्कृती आणि युरोपीय संस्कृती याजमधील अंतर हे आहे की भारतीय संस्कृतीचे ध्येय आध्यात्मिक आहे. सनातन धर्म, म्हणजे शाश्वत टिकणारा धर्म. हिंदू हा पंथ नसून मानवी आत्म्याच्या ईश्वर प्राप्तीसाठी चाललेल्या प्रयत्नांची परंपरा आहे. भारतीय धर्माचा हा अर्थ, हा भाव, आम्ही नीट लक्षात घेऊ तर भारतीय संस्कृतीचा खरा अर्थ व भाव आम्हांला कळू शकेल.

**अस्थानी टीका :**

तत्त्वज्ञान, धर्म, कला, वाङमय या बाबतीत भारत

नेत्रदीपक काम करू शकला परंतु संघटनाच्या बाबतीत तो अकुशल ठरला. व्यावहारिक बुद्धीच्या क्षेत्रात मागासलेला राहिला. राजकीय प्रयोगाच्या बाबतीत तो वन्य व निष्फळ ठरला. या विषयी इतिजासात निर्दोष राजकीय रचना विचार, आचार, मुळीच आढळत नाही. ही टीका अस्थानी आहे.

वस्तुस्थिती अशी आहे की भारतीय सभ्यतेने कौतुकास्पद राजकीय व्यवस्था निर्माण केली. तिने राजसत्तेची व लोकसत्तेची इतर तत्त्वे व प्रवृत्ती राजकीय व्यवस्थेची रचना करताना कामी लावल्या त्या व्यवस्थेची बांधणी पक्की केली.

**साम्राज्य वसाहती इत्यादी :**

भारताने विस्ताराच्या विजयाच्या स्वारीचा खराटोप करून आपल्या संस्कृतीचा विस्तार करत पूर्वेकडील जगावर स्वारी केली व त्यावर विजय मिळविला. सांस्कृतिक साम्राज्य विस्ताराची भूमिका भारताने पार पाडली. भारताने पूर्वेकडच्या जगात आपली आध्यात्मिकता, कला आणि विचारप्रणाली प्रस्थापित केल्या. भारताची ही स्वारी शांततेची होती. युद्धाची नव्हती. कारण आध्यात्मिक सभ्यतेचा विस्तार भौतिक शक्तीच्या, भौतिक विजयाच्या आश्रयाने करावा ही योजना आधुनिक साम्राज्यवादाची विचार सरणी आहे. ही त्याची वृथा गर्वाची भाषा आहे. भारताच्या प्राचीन मनोरचनेला मनोवृत्तीला आणि त्याच्या धर्मविषयक पायाभूत कल्पनेला आधुनिक राम्राज्यवादाची वरील योजना अगदी मानवणारी नव्हती. पौर्वद्वीप समूहाच्या द्वीपात वसाहती करताना भारतीय रक्त नेले, भारतीय संस्कृती नेली मात्र भारताच्या पूर्व व पश्चिम किनाऱ्यावरून ही जहाजे निघाली ती बाहेरचे देश जिंकून भारतीय साम्राज्याला ते जोडण्याच्या कार्याला वाहून घेतलेल्या आक्रमक हल्लेखोरांनी भरलेली नव्हती. तर साम्राज्य साहसी लोकानी, विदेशाला मित्र करु इच्छिणाऱ्यांनी भरलेली होती. त्यांनी आपल्या बरोबर भारतीय धर्म, स्थापत्य कला, काव्य, तत्त्व विचार, जीवन व्यवहार पद्धती या संस्कृत द्वीपातील लोकांना देण्याकरता घेतलेली होय. 'कृण्वन्तो विश्वमार्यम्' ही भूमिका होती.

**एकात्म भूमिका :**

ऐक्याची कल्पना, ऐक्याच्या आवश्यकतेची जाणीव, ऐक्य घडवून आणण्याचा सारखा प्रयत्न भारताच्या इतिहासात आरंभापासून दिसतो. वैदिक काळात तो चाललेला दिसतो. रामायण महाभारत काळी तो चाललेला दिसतो. मौर्य, गुप्त, साम्राज्यात तसेच मोंगळकाळी पेशव्यांच्या महत्त्वाकांक्षातही तो आढळतो. वैदिक काळापासून अगदी अलीकडच्या काळापर्यंत भारताच्या ऐक्यासाठी प्रयत्न केलेला दिसतो. शेवटी हा प्रयत्न फसला. आणि आपआपसात लढणारे सर्व भारतीय परकीय जोखडाखाली एका पातळीत आणले गेले व सारखेच दास्य सर्वांच्या वाट्याला आले.

प्राचीन भारतातील लोक युरोपीय लोकांप्रमाणे अलग अलग राष्ट्र नव्हते. त्यांच्यात युरोपप्रमाणे अगदी अलग राजकीय व आर्थिक जीवन नव्हते. ते एका महान आध्यात्मिक सांस्कृतिक राष्ट्राचे उपराष्ट्रभूत भाग होते. भारताचा विस्तार फार मोठा. त्याच्या ऐक्याच्या मार्गात व्यावहारिक अडचणी फार हे मान्य करून ही ऐक्य करणे सोपे होते. मात्र ते झाले नाही.

राजकीय बाह्य एकताविषयीची इच्छा वरवरची व अतिशय दुबळी वस्तुस्थिती अशी आहे की राजकीय दृष्ट्या आजही असंघटितता टिकून आहे. त्याचे कारण त्याचे आध्यात्मिक वैशिष्ट्य होय, अनेक भेदांबरोबर असणारी पायाभूत आध्यात्मिक एकताच होय.

**सांस्कृतिक एकता**

आध्यात्मिक व सांस्कृतिक एकता हीच चिरस्थायी एकता आहे. वैदिक ऋषींनी भारताच्या शरीरात आत्मा निर्माण केला. तो जागृत केला. तो प्राचीन आत्मा कशाने

ही नष्ट होणारा नाही. भारतावर अनेक परकीय स्वाऱ्या झाल्या, इस्लामी स्वारी झाली. त्यांनी भारतावर बहुत काळ राज्य केले. ब्रिटिशांनी मग भारत व्यापला. तिने आपली राज्य पद्धती लादली. पश्चिमेचे प्रचंड दडपण भारतावर आले. परंतु कशानेही भारताच्या वैदिक ऋषींनी जागृत केलेला आत्मा नष्ट होऊ शकला नाही. भारतावरील प्रत्येक आपत्तीच्या वेळी परकीय राज्याचे वेळी भारताने सक्रिय प्रतिकार केला. भारत टिकून राहिला. अवनत काळीही भारत टिकून राहिला कारण हे सामर्थ्य मारून टाकण्यासारखे नव्हते. या संस्कृतीचा पाया बाह्य वस्तूंचा नाही. तो आत्म्याच्या आंतरिक मनाचा आहे. हा पाया घालणाऱ्यांनी आध्यात्मिक सांस्कृतिक एकता हे भारताच्या जीवनाचे मूळ व खोड बनविले. भारताच्या जीवनाचे, जीवनवृक्षाचे क्षणभंगूर पुष्प हे स्थान या एकतेला त्यानी दिले नाही. त्यांनी शाश्वताचा पाया हे स्थान आध्यात्माकडे सांस्कृतिक एकतेला दिले. आता भारताने जगाचे प्रश्न सोडवावेत. कारण हे कार्य भारताच्या ध्येयाचे व आत्मसमर्थनाचे आहे.

**श्री. शं. बा. मठ**
६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
वंदना बस स्थानकाजवळ,
ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : २५३५२०३०

●●●

दिशा
नियमित
वाचा.

*आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.*

पान क्र. १९ वरून

असे अंबोलीचे रूप आहे. इथे तसा २४ तास गारवा असतो; पण कडाक्याची थंडी मात्र नसते. इथे वर्षभरात ३५० इंच पाऊस पडतो; त्यामुळे अंबोलीला महाराष्ट्राची चेरापुंजी म्हटले जाते. तिथे इतका पाऊस कोसळतो की मोठे वृक्ष मुळेच धरू शकत नाहीत. त्यामुळे तिथे फक्त हिरवे - पिवळे गवत आढळते. महाराष्ट्राची चेरापुंजी असलेले अंबोली मात्र हिरवेगार सदा टवटवीत असणारे आहे. बाकीच्या हिलस्टेशन्स्ना पावसाळ्यात न जाण्याचा सल्ला दिला जातो; पण अंबोलीचे सौंदर्य पावसाळ्यातच खरे खुलते.

**अंबोलीला कसे जावे?**

अंबोलीच्या जवळचे रल्वे स्टेशन बेळगाव, अंबोलीहून ६४ कि. मी. वर आहे. मुंबई ते अंबोली व्हाया सातारा कोल्हापूर-राधानगरी-गडहिंग्लज असे जाता येते किंवा मुंबईहून अणे-पनवेल -महाड-चिपळून-संगमेश्वर-कणकवली-कुडाळ-अंबोली ह्या मार्गाने अंतर ५४९ किलोमीटर आहे. पुणे ते अंबोली व्हाया सातारा कोल्हापूर अंतर ३९० कि.मी आहे. रत्नागिरी ते अंबोली २१५ कि.मी आहे वेगुर्ले ते अंबोली ६१ कि.मी आहे तर सावंतवाडी ते अंबोली अंतर फक्त २० कि.मी आहे. वेंगुर्ला, बेळगाव रत्नागिरी व कोल्हापूर येथून अंबोलीसाठी बससेवा उपलब्ध आहे.

**निवासव्यवस्था -**

महाराष्ट्र टूरिझम डेव्हलपमेंट कार्पोरेशनचा गव्हर्नमेंट हॉलीडे कॅम्प येथे असून त्याचे १७ सूटस् आहेत. ह्याचे आरक्षण पुणे मुंबई, गोवा ग्रथील MTDC च्या कार्यालयात होऊ शकते.

- संग्रहातून

# परिसर वार्ता

## आनंदीबाई जोशी प्राथमिक विभाग

**संस्कृती कला दर्पण :**

संस्कृती कला दर्पण ह्या संस्थेतर्फे घेण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धेत स्नेहा राठोड ही सर्वप्रथम आली असून हस्ताक्षर स्पर्धेत कृपा झुंझारराव ही सर्वप्रथम आली आहे.

तसेच भेटकार्ड स्पर्धेत दिशा पारेख हिने द्वितीय क्रमांक मिळवला.

**कै. जानकीबाई गोखले संस्कृत गीता पठण स्पर्धा :**

कै. जानकीबाई गोखले संस्कृत गीता पठण आंतरशालेय स्पर्धा रविवार दि. २५ सप्टेंबर ह्या दिवशी घेण्यात आली. या स्पर्धेमध्ये खालील विद्यार्थ्यांना पारितोषिके व प्रशस्तिपत्रके प्रदान करण्यात आली.

**लहान गट :**

| | | |
|---|---|---|
| सोहम सांगलीकर | : | द्वितीय पारितोषिक |
| विश्वराज बोरकर | : | तृतीय पारितोषिक |
| ज्ञानदा जोशी | : | उत्तेजनार्थ |
| प्रचिती दामले | : | उत्तेजनार्थ |

## के. ग. जोशी कला आणि ना. गो. बेडेकर वाणिज्य महाविद्यालय, ठाणे

**मुंबई विद्यापीठ आंतर महाविद्यालयीन विभाग-तीन व आंतर विभागीय कबड्डी पुरुष स्पर्धा २०११-२०१२**

विद्या प्रसारक मंडळाचे जोशी-बेडेकर कला व वाणिज्य महाविद्यालय ठाणे आणि मुंबई विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतर महाविद्यालयीन विभाग-तीन आंतर विभागीय कबड्डी पुरुष स्पर्धा दिनांक ३० सप्टेंबर ते ४ ऑक्टोबर या कालावधीत जोशी-बेडेकर महाविद्यालयात प्रथमच आयोजित केल्या होत्या.







या स्पर्धेचे उद्घाटन दिनांक ३० सप्टेंबर रोजी सकाळी ११.०० वाजता महाविद्यालयाच्या माजी कबड्डी राष्ट्रीय खेळाडू शिव छत्रपती क्रीडा पुरस्कार विजेत्या मीनल सावंत पालांडे यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाच्या

अध्यक्ष स्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सौ. शकुंतला सिंह मॅडम होत्या. प्राचार्या स्वत: खो-खो आणि बॅडमिंटन खेळाच्या राष्ट्रीय खेळाडू असल्यामुळे खेळाडूंना नेहमी खिलाडू वृत्तीने सहभागी होऊन हार आणि जीत चा सामना करण्याचा सल्ला देत असतात. मीनल सावंत पालांडे यांनी आपले कबड्डी खेळातील अनुभव व जोशी-बेडेकर महाविद्यालयाची माजी खेळाडू असल्याचा सार्थ अभिमान आहे असे सांगितले तसेच प्राचार्या आणि मीनल सावंत यांनी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

विभाग-तीनच्या कबड्डी स्पर्धेकरिता एकूण २४ महाविद्यालयांनी सहभाग घेतला होता. त्यामधून खालील चार महाविद्यालयांचे संघ आंतर-विभागीय स्पर्धेकरिता पात्र ठरले होते.

१) बी. एन. एन महाविद्यालय, भिवंडी.

२) ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे.

३) सम्यक संकल्प महाविद्यालय, कल्याण.

४) कमलादेवी महाविद्यालय, विठ्ठलवाडी.

मुंबई विद्यापीठ आंतर महाविद्यालयीन आंतर विभागीय कबड्डी पुरुष स्पर्धा दिनांक ३ व ४ ऑक्टोबर रोजी आयोजित केल्या होत्या.

मुंबई विद्यापीठाच्या पाच विभागांतून एकूण १६ महाविद्यालयांचे संघ या स्पर्धेकरिता पात्र ठरले होते. या स्पर्धेचा अंतिम निकाल खालील प्रमाणे आहे.

१) प्रथम क्रमांक - एम.डी. महाविद्यालय, परेल, मुंबई.

२) द्वितीय क्रमांक - बी. एन.एन. महाविद्यालय, भिवंडी.

३) तृतीय क्रमांक - झुनझुनवाला महाविद्यालय, घाटकोपर.

४) चौथा क्रमांक - रिझवी महाविद्यालय बांद्रा. मुंबई

चार दिवस चाललेल्या या कबड्डी स्पर्धेचा बक्षीस समारंभ सामने संपल्या नंतर दि. ४ ऑक्टोबर रोजी संपन्न झाला. मुंबई विद्यापीठाचे क्रीडासंचालक डॉ. यु.एन. केंद्रे आणि प्राचार्या डॉ. सौ. शकुंतला सिंह यांच्या हस्ते प्रथम,द्वितीय आणि तृतीय क्रमांकाच्या सर्व खेळाडूंना पदक (Medal) देऊन गौरविण्यात आले.

ह्या स्पर्धा आयोजनाकरिता व यशस्वीपणे पार पाडण्याकरीता महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सौ. शकुंतला सिंह मॅडम यांनी जिमखाना कमिटीला प्रोत्साहन दिले आणि मार्गदर्शन केले. उप-प्राचार्या प्रा. सौ. मोनिका देशपांडे, उप-प्राचार्य प्रा. श्री. सुभाष शिंदे यांचेही सहकार्य लाभले तसेच दोनही उप-प्राचार्य आणि इतर प्राध्यापक वर्ग सामने बघण्यासाठी आवर्जून उपस्थित होते. वरील कबड्डी स्पर्धा आयोजनाकरीता व यशस्वीपणे पार पाडण्यासाठी श्रीयुत चंदुभाई ठक्कर यांचाही मोलाचा वाटा आहे आणि नेहमीच त्यांचे सहकार्य आम्हांला लाभत असते.

तसेच सर्व जिमखाना कमिटीचे सदस्य विशेषत: कमिटी प्रमुख तेजस्वीनी नाडगौडा मॅडम, क्रीडाप्रमुख श्री. पी.पी. मोरे यांनी वरील स्पर्धा यशस्वीपणे पार पाडण्याकरीता परिश्रम घेतले.

### मुंबई विद्यापीठ आंतर महाविद्यालयीन (विभाग तीन) बुद्धीबळ स्पर्धा २०११-२०१२

विद्या प्रसारक मंडळाचे जोशी-बेडेकर कला व वाणिज्य महाविद्यालय, आणि मुंबई विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतर महाविद्यालयीन विभाग-तीन बुद्धीबळ स्पर्धा दिनांक ३ ते ५ ऑगस्ट या कालावधीत प्रथमच जोशी-बेडेकर महाविद्यालयात आयोजित केल्या होत्या. या स्पर्धेचे उद्घाटन दिनांक ३ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता मुंबई विद्यापिठाचे क्रीडासंचालक डॉ. यु. एन.

केंद्रे यांच्या हस्ते करण्यात आले. स्पर्धेचा उद्घाटन सोहळा जोशी- बेडेकर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सौ. शकुंतला सिंह यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. या उद्घाटन सोहळ्याला या महाविद्यालयाच्या उप-प्राचार्या प्रा. सौ. मोनिका देशपांडे, उप-प्राचार्य प्रा. श्री. सुभाष शिंदे आणि इतर प्राध्यापक वर्ग तसेच स्पर्धेससाठी आलेल्या महाविद्यालयांचे संघव्यवस्थापक व खेळाडू संख्येने उपस्थित होते.





क्रीडासंचालक डॉ. यु.एन. केंद्रे आणि प्राचार्या डॉ. सौ. शकुंतला सिंह यांनी खेळाडुंना मोलाचे मार्गदर्शन केले.

मुंबई विद्यापीठ विभाग-तीनच्या बुद्धीबळ स्पर्धेमध्ये एकूण २३ महाविद्यालये सहभागी झाले होते. तीन दिवस झालेल्या स्पर्धेमधून खालील चार महाविद्यालये मुंबई विद्यापीठ आंतर-विभाग बुद्धीबळ स्पर्धेसाठी पात्र ठरले होते.

१) एस. एस. टी महाविद्यालय, उल्हासनगर.

२) फादर सी. रॉड्रिक्स महाविद्यालय, वाशी.

३) बी.एन. बांदोडकर महाविद्यालय, ठाणे.

४) आर. एन. बांदोडकर महाविद्यालय, उल्हासनगर.

वरील स्पर्धा आयोजनाकरिता व यशस्वीपणे पार पाडण्यासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सौ. शकुंतला सिंह मॅडम यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. कोणत्याही खेळाच्या स्पर्धा घेण्यासाठी प्राचार्या डॉ. शकुंतला सिंह मॅडम जीमखाना कमिटीच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या असतात. तसेच जीमखाना कमिटीचे सर्व सभासद विशेषत: कमिटी प्रमुख तेजस्वीनी नाडगौडा मॅडम, क्रीडाप्रमुख श्री. पी. पी. मोरे यांनी वरील स्पर्धा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी परिश्रम घेतले.

## बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्याल ठाणे

**सांस्कृतिक मंडळ :**

सांस्कृतिक मंडळातर्फे स्वामी समर्थ सुगम संगीत स्पर्धा कनिष्ठ व पदवी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकरता दि. १५ सप्टेंबर २०११ रोजी पतंजली सभागृहात आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेचे उद्घाटन सौ. किशोरी पत्की व सौ. मोहिनी कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. या स्पर्धेमध्ये ३० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. विजेत्या विद्यार्थ्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र | विद्यार्थ्यांचे नाव | क्रमांक |
|---|---|---|
| १ | कु. अनुष्का कुलकर्णी, अकरावी | प्रथम |
| २ | स्वीकार घंघाळे, प्रथम वर्ष माहिती तंत्रज्ञान शाखा | द्वितीय |

| | | |
|---|---|---|
| ३ | प्राजक्ता बहाळे,रावी इयत्ता<br>अभय डोंगरे, प्रथम वर्ष विज्ञान शाखा | तृतीय |
| ४ | अनघा साळूंखे, प्रथम वर्ष विज्ञान शाखा<br>सिद्धांत शिंदे | उत्तेजनार्थ |

**साहित्य सहवास :**

साहित्य सहवास तर्फे दि. १० ऑगस्ट रोजी स्त्री भ्रूण हत्या व हुंडा विरोधी चळवळ यांवर एक कार्यक्रम पतंजली सभागृहात आयोजित करण्यात आला होता. यावेळी १० विद्यार्थ्यांनी कविता सादर केल्या. यावेळी स्त्री भ्रूण या विषयावर चित्रपट दाखवण्यात आला होता.

**योगा समिती :**

विद्यार्थी व शिक्षक यांना संपूर्ण स्वास्थ Certificate Course in Yoga हा अभ्यासक्रम दि. २८ जून ते २३ ऑगस्ट या कालावधीत घेण्यात आला होता. १० विद्यार्थी व २ स्टाफ सदस्यांनी हा कोर्स यशस्वीपणे पूर्ण केला. हा अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थी व स्टाफना यावेळी श्री. रामचंद्र सुर्वे, सेक्रेटरी, अंबिका योग कुटीर, ठाणे यांच्या हस्ते प्रशस्तिपत्र देण्यात आले. योगाभ्यास आपले तन व मन तंदुरुस्त ठेवण्यास मदत करतो त्यामुळे योगाचा सराव प्रत्येक व्यक्तीने आपल्या दैनंदिन जीवनात करण्याचा संदेश सुर्वे गुरुजींनी येथे दिला.

**ट्रेकींग व हायकींग समिती :**

ट्रेकींग व हायकींग समिती तर्फे दि. १८ सप्टेंबर रोजी कोंडाणे, कर्जत येथे एक दिवसाचा ट्रेक आयोजित करण्यात आला होता. ७ शिक्षक व १० विद्यार्थ्यांनी या ट्रेकमध्ये सहभाग घेतला होता.

**लिटररी मंडळ :**

गांधी जयंतीचे औचित्य साधून गांधी रिसर्च फांउडेशन, जळगाव यांच्यातर्फे राज्यस्तरीय 'गांधी विचार 'संस्कार परीक्षा' डॉ. एम.बी. शहा लिखित गांधी गंगा या पुरस्कावर कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी आणि एम. के. गांधी लिखित संक्षिप्त आत्मकथा या पुस्तकावर पदवी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आली होती. लिटररी मंडळातर्फे ही परीक्षा दि. ३० सप्टेंबर रोजी घेण्यात आली होती. या परीक्षेला ८८ विद्यार्थ्यी सहभागी झाले होते. सहभागी विद्यार्थ्यांना गांधी रिसर्च फांउडेशनतर्फे प्रशस्तिपत्र देण्यात आले आणि प्रत्येक जिल्ह्यातून परीक्षेचे पहिले तीन विजेते घोषित करण्यात येणार आहेत.

दि. २० ऑगस्ट रोजी कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकरता Stress Management या विषयावर डॉ. सौ. अनुराधा सोवनी, Clinical Psychologist व Psychotherapist यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

**विद्यार्थी नैपुण्य :**

१. कु. सुप्रिया दत्तात्रय उकिर्डे, हिला यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान - मुंबई, नवमहाराष्ट्र युवा अभियान, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विदयमाने आयोजित ''जागर हा जाणिवांचा, तुमच्या माझ्या लेकींचक. . .'' यावर राज्यस्तरीय निबंध व चित्रकला स्पर्धा २०११ मध्ये मुंबई विभागांतर्गत पदव्युत्तर गटामध्ये तृतीय पारितोषिक प्राप्त झाले.

२. निखिल नारायण सरनोबत, प्रथम वर्ष विज्ञान शाखा याने ११ ते १४ ऑगस्ट या कालावधीत पुणे येथे झालेल्या वेस्ट झोन मैदानी क्रीडा स्पर्धेत मिळवलेले प्रावीण्य पुढीलप्रमाणे

| अ.नं. | स्पर्धा | क्रीडा प्रकार | प्राविण्य |
|---|---|---|---|
| १ | आंतर क्लब राज्यस्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धा, पुणे | उंच उडी (१.८५मी.) | रौप्य |
| २ | पश्चिम विभागीय मैदानी स्पर्धा, पुणे | उंच उडी (१.९६ मी.) | सुवर्ण |

**प्राध्यापक नैपुण्य :**

१. श्री. प्रकाश माळी, कनिष्ठ महाविद्यालय, रसायनशास्त्र विभाग यांना शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील त्यांच्या प्रशंसनीय जनसेवेच्या गौरवार्थ महाराष्ट्र शासनातर्फे शिक्षकांकरिता राज्य पुरस्कार २०११ प्रदान करण्यात आला.

२. श्री. प्रकाश माळी, कनिष्ठ महाविद्यालय, रसायनशास्त्र विभाग यांची शांतता समिती सदस्य, श्रीराम नगर, उल्हासनगर - ४ साठी ठाणे पोलिस आयुक्तालयातर्फे निवड झाली आहे.

३. श्री. प्रकाश माळी, कनिष्ठ महाविद्यालय, रसायनशास्त्र विभाग हे अखिल भारतीय कला साहित्य संस्कृती अकादमीतर्फे जयजगत केसरीरत्न पुरस्काराचे मानकरी ठरले आहेत.

४. डॉ. पूनम कुर्वे, सहाय्यक प्राध्यापक, प्राणिशास्त्र विभाग यांनी स्कॉटलंड येथे २६ ते ३० सप्टेंबर या कालावधीत आयोजित World Conference On Marine Biodiversity मध्ये Coastal Tourism in Alibaug, Raigad यावर Oral Presentation सादर केले.

५. डॉ. सौ. अनिता गोस्वामी-गिरी, रसायनशास्त्र विभाग यांना राष्ट्रीय महिला व अपंग विकास प्रशिक्षण संस्था, कल्याण यांच्यातर्फे **राज्यस्तरीय समाज भूषण पुरस्कार** प्रदान करण्यात आला.

६. डॉ. सौ. पूजा जगासिया व डॉ. अपर्णा भारद्वाज सहाय्यक प्राध्यापक रसायनशास्त्र विभाग यांना मुंबई विद्यापीठातर्फे प्रत्येकी रू. २०,०००/- इतकी रक्कम मिनी रिसर्च प्रोजेक्टकरता मंजूर करण्यात आली.

## विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय, ठाणे



**श्री. नचिकेत पाटिल**

१) विद्यार्थी परिषदेची स्थापना होऊन शिक्षक प्रतिनिधी म्हणून तृतीय वर्ष विधी च्या श्री. नचिकेत पाटिल यांची निवड झाली.

२) मुंबई विद्यापीठाच्या दूर व मुक्त शिक्षण विभागाच्या प्रथम वर्ष वाणिज्य शाखेचा परीक्षा १३ ते २० ऑक्टोबर दरम्यान पार पडला.

३) विधी महाविद्यालयाच्या सराव परीक्षा ३१ ऑक्टोबर ते ३ नोहेंबर दरम्यान पार पडल्या.

४) आमच्या महाविद्यालयाचे विद्यार्थी श्री. जयेश गोपाळ गोखले यांनी मुंबई विद्यापीठातर्फे घेण्यात आलेल्या प्रथम वर्ष विधी परीक्षेत ८०० पैकी ५३६ गुण मिळवून मुंबई विद्यापीठात प्रथम येण्याचा मान पटकावला. ते 'अरुणादित्य विष्णू के धुरंधर सुवर्ण पदक' सन २०११ चे मानकरी ठरले.

## तंत्रनिकेतन वार्ता

**ठाण्यात वि. प्र. मंडळाच्या तंत्रनिकेनतर्फे १३ व्या एक दिवशीय राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन**

विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनतर्फे शनिवार दि. १५ आक्टोबर रोजी '' प्रोग्रेस अॅन्ड प्रॉस्पर थ्रू ऑनथ्राप्रेनर्स इन्ट्राप्रेनर्स'' या विषयी १३ वी एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. ही परिषद विद्या प्रसारक मंडळाच्या थोरले बाजीराव पेशवे सभागृह येथे सकाळी ९.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत पार पडली.




**१३ व्या एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेत सहभागी असलेले मान्यवर व्यासपीठावर डावीकडून बसलेले १) प्राचार्य डी. के. नायक (कन्व्हेनर) वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन, ठाणे, २) डॉ. ए. बी. पंडित, प्रमुख वक्ते, रिसर्च सायंटिस्ट, प्रोफेसर केमिकल इंजिनियरिंग ICT व HYCA टेक्नालाजी प्रा. लि. मुंबई. ३) डॉ. व्ही. व्ही. बेडेकर चेअरमन, विद्या प्रसारक मंडळ, ठाणे. ४) श्री. जगदिश आचार्य प्रमुख पाहुणे (CEO, Asian PPG, मुंबई. ५) प्रोफेसर व्ही. एस. भाकरे, (Co. Convener, Hon. prof. FNd. Dnst. Interaction) ६) मिस. दिप्ती मिस्की सचिव संघटन लेक्चर-इनस्ट्रमेंटेशन विभाग. वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन, ठाणे.**

सदर परिषदेस प्रमुख पाहुणे म्हणून श्री. जगदीश आचार्य (CEO, Asian PPG, Mumbai) प्रमुख वक्ते म्हणून डॉ. ए. बी पंडित (रिसर्च सायंटिस्ट, प्रोफेसर केमिकल इंजिनिअरिंग ICT आणि चेअरमन, HYCA Technologies Pvt. Ltd., Mumbai) हजर होते. डॉ. व्ही. व्ही. बेडेकर (कार्याध्यक्ष, वि. प्र. मंडळ, ठाणे) कार्यक्रमाचे अध्यक्ष होते.

तीन सत्रांत चालणाऱ्या या परिषदेत व्यवसाय सुरू करण्याची प्रक्रिया, भांडवल उपलब्ध करुन घेण्याचे पर्याय, शासकीय योजना उद्योजक व कार्यकारी अधिकारी यांचे विविध क्षेत्रातील महत्त्व अशा अनेक विषयावर चर्चा करण्यात आली. परिषदेचा सुरुवातीला प्राचार्य दि. कृ. नायक यांनी सर्व मान्यवराचे व उपस्थितांचे स्वागत करुन परिषद आयोजित करण्यामागची भूमिका स्पष्ट केली. प्रा. व्ही. एस. भाकरे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला व परिषदेच्या विषयाचे महत्त्व स्पष्ट केले. दरम्यान प्रमुख पाहुणे व मान्यवरांच्या शुभहस्ते स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. या स्मरणिकेत संबधित विषयावरील तज्ज्ञाचे लेख प्रसिद्ध करण्यात आले आहेत. शिवाय या स्मरणिकेत व्यवसायिक माजी विद्यार्थ्यांची व त्यांच्या व्यवसायाची माहिती छायात्रिछासहित प्रकाशित करण्यात आली आहे.

उद्योजक ही काळाची गरज आहे. देशाच्या आर्थिक विकासासाठी उद्योजकाचा मोठा वाटा असतो. म्हणूनच जास्तीत जास्त लोकांनी तसेच विद्यार्थ्यांनी स्वयंप्रेरणेने भविष्यात स्वत:च व्यवसाय सुरू करण्यासाठी प्रयत्न करावा असे आवाहन परिषदेचे अध्यक्ष डॉ. व्ही. व्ही. बेडेकर यांनी केले.प्रमुख पाहुणे श्री. जगदीश आचार्य यांनी स्व:ताचे अनुभव उपस्थितांना करुन दिले व उद्योजकाचे महत्त्व स्पष्ट केले. प्रमुख वक्ते डॉ. ए. बी. पंडित यांनाही आपले उद्योजकीय विचार स्पष्ट केले. डॉ. डी. डी. काळे व

श्री. प्रशांत कोकीळ या दोन मान्यवरांनी व तज्ज्ञानी चेअर पर्सन म्हणून महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली. दिवसभर चाललेल्या परिषदेत अनेक तज्ज्ञांनी आपले शोधनिबंध सादर केले त्यामध्ये अनेक माजी विद्यार्थ्यांचा समावेश होता.

सदर परिषदेत अनेक उद्योजक माजी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

दिवसभर चाललेल्या या परिसंवादास माजी. विद्यार्थी व्यवसायिक शिक्षक विद्यार्थी, व्यवसाय सुरु करण्याची इच्छा असणाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात उपस्थित राहून या संधीचा लाभ घेतला.

सदर परिषदेचे संघटन सचिव म्हणून मिस. दिप्ती मिस्त्री (IS. Dept.) यांनी काम पाहिले.

वृत्तसंकलन
**श्री. चंद्रकांत शिंगाडे**
वि.प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन ठाणे.

●●●



## विचार

समाज कसा हवा? जिथे कोणी गरीब असणार नाही. कोणी उच्च नसेल, कोणी नीच नसेल, चाकरी देणारा लक्षाधीस नसेल, अर्धपोटी चाकर नसेल, दारूडे नसतील मादक द्रव्यांची पिंपे नसतील, पुरुषा इतकाच स्त्रीयालाही मान असेल, दोघानाही आपले पावित्र्य अबाधित राखण्याचा सारखाच अधिकार असेल, प्रत्येक पुरुष, मग तो कुठल्याही धर्माचा असो; स्व:ताच्या पत्नीशिवाय अन्य स्त्रियाकडे त्यांच्या वयानुसार आई, बहीण, मुलगी या नात्यानेच पाहील. तिथे अस्पृश्यता नसेल व सर्व धर्माकडे सारख्याच आदराने पाहिले जाईल. आणि प्रत्येक जण प्रामाणिकपणे, आनंदाने पोटासाठी काम करील. असा समाज निर्माण झाला तर पृथ्वीवरच स्वर्ग निर्माण होईल. निराळ्या स्वर्गची कोणी इच्छा धरणार नाही.

– महात्मा गांधी



# जाहीर आवाहन

**विद्या प्रसारक मंडळ, ठाणे :**

विद्या प्रसारक मंडळ १९३५ सालापासून गेली सुमारे ७५ वर्षे ठाण्यात शैक्षणिक प्रसाराचे कार्य करीत आहे. आधुनिक पद्धतीचे व जागतिक दर्जाचे अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याचा मंडळाचा मानस आहे.

**कोकण परिसराची निवड :**

एका बाजूला समुद्रकिनारा व दुसऱ्या बाजूला सह्याद्रीच्या रांगा यांच्या मधील या पट्ट्यातील जनता गेली सुमारे ४०० वर्षे उत्पादन क्षमता नसल्यामुळे जगण्यासाठी झगडत असते. पर्यटन व्यवसाय हाच काय तो व्यवसाय त्यांना थोडीफार साथ देत असतो.

कोकणातल्या रत्नागिरी आणि सिंधुदूर्ग जिल्ह्यांची एकूण लोकसंख्या जवळ जवळ ३० लाख आहे. तरी सुद्धा उच्च शिक्षणामध्ये दोन्ही जिल्हे मागास म्हणून गणले जातात आणि त्याचे कारण म्हणजे, उच्च शिक्षणाकडे कमी वळतात हे आहे. २००७ साली दिल्लीच्या विद्यापीठ अनुदान आयोगाने स्थापन केलेल्या एका समितीने संपूर्ण देशभर याविषयावर सर्वेक्षण करून आपला अहवाल सादर केला होता. त्या अहवालात संपूर्ण देशात ज्या भागामध्ये पुढे येण्याची प्रवृत्ती दिसत नाही, अशा भागांत आधुनिक धर्तीवर महाविद्यालये मोठ्या संख्येने निर्माण केली पाहिजे असे मत मांडले होते. भारताची उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांची सरासरी फक्त १२.४ आहे. त्या समितीला असेही आढळून आले की ५९३ जिल्ह्यांपैकी ३७४ जिल्हे असे आहेत की त्याठिकाणी उच्च शिक्षणासाठी काहीच सोयी नाहीत. महाराष्ट्र राज्यात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांच्या टक्केवारीचे प्रमाण १७.३३ टक्के असून रत्नागिरी जिल्ह्याची उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची टक्केवारी सर्वांत कमी आहे.

उच्चशिक्षण देणाऱ्या ७० टक्के संस्था एक तर मोठ्या शहरांत किंवा नागरी भागांत आहेत. याचे मुख्य कारण तेथील विद्यार्थ्यांना खर्चिक उच्च शिक्षण घेणे परवडते व शिक्षणासाठी आवश्यक शिक्षकवर्गही उपलब्ध होतो. यामुळे ग्रामीण भागांतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी मोठ्या शहरातील महाविद्यालयांमध्ये जावे लागते. यावर उपाय एकच, की अशा प्रकारच्या संस्था आणि उच्च दर्जाचे शिक्षण देणारी महाविद्यालये ही ग्रामीण भागात काढली जावीत. यासाठी आवश्यक त्या मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करणे व त्यासाठी लागणारा खर्च करणे यांची पूर्तता करावी लागते. त्यामुळे गरजू व हुशार ग्रामीण विद्यार्थ्यांची सोय तर होईल; पण त्या ग्रामीण भागाचा मोठ्या प्रमाणावर विकास घडून येईल. तिथल्या लोकांचा फायदा व गरजूंना कामधंदे उपलब्ध होतील आणि त्या ग्रामीण भागाचे महत्त्वही वाढेल.

**विद्या प्रसारक मंडळाच्या नवीन प्रकल्पविषयी:**

**कोकणातील गुहागर जवळ असलेला वेळणेश्वर हा ग्रामीण भाग मंडळाने नियोजित शैक्षणिक प्रकल्पासाठी निवडला आहे.** त्या गावची लोकसंख्या जवळपास ३५०० आहे व अशा गावात सुमारे ६५ एकर वरकस जमीन मंडळाने खरेदी केली आहे. तेथे एक शंकराचे सुरेख मंदिर आहे. त्याला वेळणेश्वर असे नाव आहे. शिवाय अरबी समुद्राची किनारपट्टी ही या गावाला लागून आहे. सरकारच्या नियोजित आराखड्याप्रमाणे लवकरच तयार होणार सागरी किनारपट्टी महामार्गही वेळणेश्वर गावाच्या बाजूने जाणार आहे.

या वास्तू समूहामध्ये ६ शैक्षणिक विभागांसाठी स्वतंत्र इमारती, प्राचार्य व प्रबंधकासाठी बंगले, विषय प्रमुख व प्राध्यापक व प्रमुख कर्मचारी यांच्यासाठी स्वतंत्र वास्तू

आणि विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे व इतर संबंधित वास्तू असे सर्व मिळून दहा लाख चौरस फुटांचे बांधकाम असलेला प्रकल्पाचा पूर्ण **खर्च १५० कोटी रुपये पर्यंत अपेक्षित आहे.** त्यामध्ये ३००० विद्यार्थी निरनिराळ्या विभागांतून शिक्षण घेतील. शिक्षकी पेशातील, कार्यालयीन कर्मचारी, शास्त्रीय व इतर विषयांचे तंत्र आणि सादिलवार कामे करणारे असे सर्व मिळून १००० व्यक्ती असतील. शिवाय वरील अनुषंगाने इतर कामे करण्यासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष इतरही व्यक्तींची वर्दळ वाढेल. याशिवाय, प्रकल्प सुरू झाल्यानंतर प्रकल्पा बाहेरच्या व्यक्तींनासुद्धा वाव मिळेल.

प्रकल्पाचा कल्पकतापूर्ण आराखडा जो ३००० विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी तयार केल आहे. त्याला चिपळूणच्या सहाय्यक जिल्हाधिकाऱ्यांनी मंजुरी दिली असून, त्याचा पहिला टप्पा २०१२ पर्यंत पूर्ण होणार आहे. सुरुवातीला २४० विद्यार्थ्यांना प्रवेश अपेक्षित असून अभियांत्रिकीचा एकूण ४ वर्षाचा पदवी अभ्यासक्रम असेल. २०१२-१३ शैक्षणिक वर्षापासून अभियांत्रिकी महाविद्यालय चालू करण्याचे मंडळाने ठरविले आहे. त्यानंतर नव्याने अभियांत्रिकी, व्यवस्थापन, वास्तुशास्त्र आणि हॉटेल व्यवस्थापन याप्रमाणे नवीन अभ्यासक्रम सुरू होतील.

**देणगीसाठी व मुदत ठेवीसाठी आवाहनः**

मंडळाला दानशूर, समाजसेवक, उदारमताच्या व्यक्ती, यांच्याकडून मिळणाऱ्या आर्थिक मदतीशिवाय दुसरा कोणताही उत्पन्नाचा मार्ग नाही. तुटपुंज्या फीच्या उत्पन्नामध्ये अशी नवीन महाविद्यालये निर्माण करणे शक्य नाही आणि म्हणून या सर्व बांधकामासाठी लागणारा आर्थिक पुरवठा बँकांकडून कर्ज घेऊन व जनतेकडून देणारी स्वरूपात मदत घेऊन करण्यात येतो.

नियोजित अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या बांधकामासाठी बँकेकडून मिळणाऱ्या कर्जाव्यतिरिक्त लागणारा निधी उपलब्ध करण्यासाठी रु. १० कोटींपर्यंत खालील अटींवर वैयक्तिक ठेवी स्वीकारण्यास धर्मादाय आयुक्त, मुंबई यांनी मान्यता दिली आहे.

१) संस्थेकडे ठेवण्यात येणाऱ्या ठेवी या कमीतकमी रु. ५०००/- त्याच्या पटीत स्वीकारण्यात येतील.

२) सदर ठेवीचा कालावधी ५/७ व १० वर्षाचा असेल. किमान ३ वर्षांपर्यंत ठेव परत केली जाणार नाही.

३) ठेवीसाठी वारसदार नेमणे आवश्यक असेल.

४) ठेवीच्या कालावधीत ठेवीदाराचा मृत्यू ओढवल्यास त्याच्या वारसास पंधरा दिवसात ठेव परत करण्यात येईल.

५) सदर ठेवीवर दरसाल दर शेकडा ५ टक्के सरळ व्याज दराने प्रत्येक वर्षाच्या मार्च महिन्याच्या अखेरीस व्याज देण्यात येईल.

६) काही अपरिहार्य कारणामुळे मुदतीपूर्वी ठेव मोडावयाची असल्यास, ठेवीदाराने ३ महिन्याची आगाऊ सूचना देणे आवश्यक असेल व ती मुदत ठेव ठेवल्यापासून सहा महिन्याच्या आत मोडल्यास त्यावर व्याज अनुदेय राहणार नाही.


या प्रकल्पावरती पुढील १० वर्षात सुमारे १५० कोटी रुपये खर्च होईल. हा प्रकल्प पूर्णत्वास जाणे हे त्यावेळेसच शक्य होईल, जेव्हा सर्व स्तरांतील दानशूर व्यक्ती व संस्थांचा हातभार लागेल. **या आवाहनातर्फे आम्ही आपणांस विनंती करतो की आपण अशा शैक्षणिक कार्यास सढळ हस्ते देणगी किंवा मुदत ठेवीच्या स्वरूपात मदत करावी व मंडळाच्या या राष्ट्रीय स्वप्नपूर्तीस हातभार लावावा.**

आपला विश्वासू,
**डॉ. विजय बेडेकर**
कार्याध्यक्ष
विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

●●●

# विपत्तीमध्ये तू माझं रक्षण कर

विपत्तीमध्ये तू माझं रक्षण कर,
ही माझी प्रार्थना नाही.
विपत्तीमध्ये मी भयभीत होऊ नये
एवढीच माझी इच्छा.
दु:खतापानं व्यथित झालेल्या माझ्या मनाचे
तू सांत्वन करावंस, अशी माझी अपेक्षा नाही
दु:खावर जय मिळवता यावा,
एवढीच माझी इच्छा.
माझ्या मदतीला कोणी आलं नाही
तर माझं बळ मोडून पडू नये एवढीच इच्छा.
जगात माझं नुकसान झालं,
केवळ फसवणूकच वाट्याला आली,
तर माझं मन खंबीर राहावं, एवढीच माझी इच्छा.
माझं तारण तू करावंस,
मला तारावसं ही माझी प्रार्थना नाही.
तरून जाण्याचं सामर्थ्य माझ्यात असावं
एवढीच माझी इच्छा.



माझं ओझं हलकं करून
तू माझं सात्वन केलं नाहीस तरी,
माझी तक्रार नाही
ते ओझं वाहायची शक्ती मात्र माझ्यात
असावी, एवढीच माझी इच्छा.
सुखाच्या दिवसात नतमस्तक होऊन
मी तुझा चेहरा ओळखावा
दु:खाच्या रात्री
सारं जग जेव्हा माझी फसवणूक करील
तेव्हा तुझ्याविषयी माझ्या मनात
शंका निर्माण होऊ नये,
एवढीच माझी इच्छा.

– गुरुदेव रवींद्रनाथ ठाकूर

# पसायदान



आतां विश्वात्मकें देवें । येणें वागयज्ञें तोषावें । तोषोनि मज द्यावें । पसायदान हें ।। १ ।।
जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रती वाढो । भूतां परस्परें पडो । मैत्र जीवाचें ।।२ ।।
दुरिताचे तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्ये पाहो । जो जें वांछिल तो तें लाहो । प्राणिजात ।।३।।
वर्षत सकळमंगळी । ईश्वर निष्ठांची मांदियाळी । अनवरत भूमंडळी । भेटतु भूतां ।। ४ ।।
चलां कल्पतरुं चे आरव । चेतना चिन्तामणीचें गांव । बोलते जे आर्णव । पीयूषाचे ।। ५ ।।
चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन । ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ।। ६ ।।
किंबहुना सर्वसुखीं । पूर्ण होऊनि तिहीं लोकीं । भजिजो आदिपुरुखी । अखंडीत ।।७ ।।
आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकी इये । दृष्टादृष्टविजयें । होआवें जी ।। ८ ।।
येथ म्हणें श्रीविश्वेशरावों । हा होईल दानपसावो । येणें वरें ज्ञानदेवो । सुखिया झाला ।। ९ ।।

## ❈ पसायदानाचा गद्य अर्थ ❈

आता यावर विश्व स्वरूप, सद्‌गुरु यांनी माझ्या वागयज्ञेकरून संतुष्ट होऊन मजला हा प्रसाद द्यावा, कीं, दुष्टांचा कुटिलपणा जाऊन त्यांना सत्कर्माची प्रीती उत्पन्न होवो; व जीवमात्रांची एकमेकांशी मैत्री वाढो. या सर्व विश्वामधील पापरूपी अंधकार नाहीसा होऊन स्वधर्मरूपी सूर्य उगवून त्याचा प्रकाश होवो आणि प्राणिमात्राच्या ज्या ज्या इच्छा असतील त्या त्या पूर्ण होवोत.


या भूतलावर अखिल मंगलांचा वर्षाव करणाऱ्या भगवत् भक्तांच्या समुदायांची सर्व भूतांना सद्‌भावेकरून सदोदित भेट होवो. ते भक्तजन कसे आहेत, तर चालते बोलते कल्पतरूचे बाग, जिवंत चिंतामणीचे गाव, किंवा अमृताचे चालते बोलते समुद्रच होत. जे कलंकरहित प्रतिचंद्र, संसाररूपी अधंकार दूर करून शांतिसुख देणारे प्रतिसूर्य असे भगवत् भक्त, ते सकल जीवांना प्रिय होवोत.

फार काय मागावे! सर्व त्रैलोक्यसुखाने परिपूर्ण होऊन प्राणिमात्राला हरीचें अखंड भजन करण्याची इच्छा होवो आणि या ग्रंथावरच ज्यांचे उपजीवन आहे, त्यांना इहलोकचे व परलोकचे सुख प्राप्त होवो !

तेव्हा सदगुरू प्रसन्न होऊन म्हणाले की, तुझ्या म्हणण्याप्रमाणे सर्व होईल. असे वरप्रदान मिळाल्याने श्रीज्ञानदेव फार संतोषित झाले.

(अध्याय अठरावा : ओवी क्र. १७९३ ते १८०१)

# स्वप्न साकारत आहे...



हे स्वप्न नव्हे एका व्यक्तीचे ! ते आहे समाजातील विचारवंतांचे,
हे स्वप्न नव्हे महंमदी मनोऱ्याचे, ते आहे श्रमिक योजनांचे
हे स्वप्न नव्हे खुशालवंतांचे, नव्हे ते आरामितांचे
नसे ते फावल्या क्षणांचे, गुलजार गादीत विसावतांचे
ते असे अहर्निश श्रमांचे, तसे ते असे श्रमोपासकांचे,
सदा ध्येयध्यासीं मग्न त्यांचे !
हे स्वप्न नव्हे व्यक्तिवैभवाचे, नसे ते आत्मगौरवाचे,
ते असे समाजोन्नतीचे, असे ते युवागौरवाचे
हे स्वप्न न दिसे एका क्षणीं, न एका दिनीं,
न एके यामिनी
दिनरात्र मानसी स्फुरे, सतत निद्रानाशही तें करी !
हे स्वप्न नसे सानुले, नसे ते चौकटी बांधिले
ते असे, भव्यता जयाची महान, सीमा जयाची अस्मान !
हे स्वप्न जसे आमुचे, असावे तसे उपस्थितांचे,
मुदित मनीं सुस्वागत अपुलें करितां
स्वप्न दिसे साकारले
आणि हे स्वप्न कसे आहे ते पहा –
ओसाड भूमी कर्दमीं जिथे घाण
द्वीप साजिरे आज तेथे दृश्यमान
ज्ञानसूर्य येथे उगवला, अज्ञान अंधार लोपला,
दिनरात्र प्रकाश अर्पी, अस्त न जया कल्पिला.
भव्य वास्तू इथे साकारती, दृश्य जयाचें महान,
शिल्पही जयांचे विशेषज्ञान देखिती
मनी जे सुजाण,
दृश्य देखतां जाणवे भव्यता, प्रासाद जणूं सरस्वतीचा,
ज्ञानवीणा जिथे झंकारे सदासर्वदा,
बगीचे जिथे बहरती फुलाफुलांचे रंगरंगती,
उद्यानीं बहरती ताटवे, कारंजी जिथे फवारती.
युवायुवतींचे मग्न घोळके, स्वप्न रंगवितां मग्न जे मानसी
स्वप्न तयांचे आकार घेई, अनुरागप्रारंभ येथेच होई
आचार्य आणि प्राचार्य, सदा इथें रंगती
विज्ञानसत्रीं सदा जयांची वाहिली मती,
कलावंत, सरस्वतीचे तन्मणी, तसे वैज्ञानिक महान्,
इथे जन्मती प्रतिभा जयांची देदीप्यमान
भूदल-सागर-सैनिक, वायुपुत्रही इथे निर्मिती
शक्तियुक्ति जयांची भारतमातेप्रती
नवमानव, नवनागरिक, प्रयत्नीं इथे घडतसे
सत्य, शिव, सुंदर जयांचे अणुरेणीं वसे.
बालके तव शिशुमंदिरी दाखल होतां,
विद्यामंदिरी दौड तयाची न रोखितां
नवयुवक हा प्रवेशितां विद्येचे महाद्वार
स्वप्न आमुचे तयाभोवती होई साकार
नवयुवक हा भारतभूचा सुपुत्र व्हावा,
बुद्धि जयाची, शक्ति जयाची भारतभूचा ठेवा

– डॉ. वा. ना. बेडेकर

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006


# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- *अत्याधुनिक दृक्‌श्राव्य यंत्रणा*
- *वातानुकूलित प्रसन्न वातावरण*
- *वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा*

*अशा सुविधांनी युक्त*

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत, ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

## संपर्क

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.